cmyk

## संपादकीय

### पक्ष की परिवार? राष्ट्रवादीसमोरील मोठा प्रश्न

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष एकेकाळी पर्यायाचे, समन्वयाचे आणि अनुभवी नेतृत्वाचे प्रतीक मानला जात होता. शरद पवार यांच्या राजकीय कौशल्यातून उभ्या राहिलेल्या या पक्षाने अनेक चढ-उतार अनुभवले, सत्ता मिळवली, विरोधात बसून संघर्ष केला आणि राज्याच्या राजकारणात स्वतःची स्वतंत्र छाप निर्माण केली. मात्र आज त्याच पक्षावर अस्तित्वाचा प्रश्न उभा ठाकला आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-५८ | सोमवार दि.१८ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### नाशिकमध्ये चौघांचा बुडून मृत्यू

नाशिकः सिन्नर तालुक्यातील नांदूरशिंगोटे येथे धुणे धुण्यासाठी गेलेल्या बंधाऱ्यामध्ये आईसह तीन मुलांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आईसोबत बंधाऱ्यामध्ये पोहण्यासाठी गेलेली तीन मुले गाळात अडकल्याने त्यांना वाचवण्यास गेलेल्या आईचा देखील बंधाऱ्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली असून, हे कुटुंब यवतमाळ जिल्ह्यातील असून ते पुणे येथे मजुरीसाठी जात असताना नांदूर शिंगोटे येथे थांबले होते त्यावेळी ही घटना घडली. मनीषा विजय रामजोशी (वय ३०), कार्तिक विजय रामजोशी (वय ९) या माय-लेकासह आदित्य राहुल शिंदे (वय ७), अविनाश राहुल शिंदे (वय ८) हे दोन्ही सख्खे भाऊ असे एकूण चार जणांचा बंधाऱ्यात बुडून मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### केदारनाथमध्ये क्षमतेपेक्षा अधिक भाविकांची गर्दी

गौरीकुंडः या वर्षी उत्तराखंडमधील केदारनाथ धाममध्ये येणारी प्रचंड गर्दी आणि त्यांना सांभाळण्यासाठी केलेल्या व्यवस्था चिंता वाढवत आहेत. परिस्थिती अशी आहे की, समुद्रसपाटीपासून १२ हजार फूट उंचीवर हजारो भाविक रोज दर्शनासाठी धडपड करत आहेत, कारण दररोज सरासरी २५ हजार भाविक येथे पोहोचत आहेत. प्रशासनाचा दावा आहे की, यावेळी प्रवासी क्षमता २२ ते २४ हजारपर्यंत वाढवण्यात आली आहे, परंतु यात्रेच्या पहिल्या दिवसापासूनच यापेक्षा जास्त भाविक येत आहेत. त्यामुळे घोडा थांबण्याच्या ठिकाणापासून मंदिरापर्यंतची सर्व दुकाने, तंबू, गेस्ट हाऊस, छोटे लॉज सर्व हाऊसफुल आहेत आणि आपत्कालीन परिस्थितीत थांबावे लागल्यास एका खोलीचे रात्रीचे भाडे ५ ते १० हजार रुपयांपर्यंत जात आहे. ५ बाय तीनचे तंबूही २ ते ६ हजार रुपयांत कसेबसे मिळत आहेत. तर, २१ किमी खाली गौरीकुंड आणि सोनप्रयागमध्येही अशीच परिस्थिती आहे.

### सिद्दीकींच्या आमदारकीवर टांगती तलवार!

मुंबईः राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात पुन्हा एकदा अंतर्गत घडामोडींना वेग आला असून, पक्षाचे नेते झिशान सिद्दीकी यांच्या विधान परिषद आमदारकीभोवती आता कायदेशीर वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यांच्या उमेदवारीसाठी देण्यात आलेल्या एबी फॉर्मवरील सहीमुळे हा संपूर्ण पेच निर्माण झाला आहे. झिशान सिद्दीकी यांच्या एबी फॉर्मवर खासदार सुनील तटकरे यांनी 'प्रदेशाध्यक्ष' या नात्याने सही केल्याचे समोर आले आहे. मात्र, त्यानंतर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या नावाने निवडणूक आयोगाला पाठवण्यात आलेल्या पत्रामुळे या सहीच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. सुत्रांच्या माहितीनुसार, २९ एप्रिल रोजी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात सुनील तटकरे यांच्या नावासमोर 'प्रदेशाध्यक्ष' असा उल्लेख करण्यात आलेला नव्हता. तसेच पक्षाकडून होणारा अधिकृत पत्रव्यवहार अंतिम मानावा, असेही त्या पत्रात स्पष्ट करण्यात आले होते. यानंतर अवघ्या एका दिवसाने, म्हणजे ३० एप्रिलला झिशान सिद्दीकी यांच्या एबी फॉर्मवर तटकरे यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणून सही केल्याचे समोर आल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.०० क्विंटल | २,०४१ | ३,१५१ | २,३७० |
| ज्वारी/हायब्रिड :१५८.५० क्विंटल | १,९०० | ५,१५२ | २,५६८ |
| मका/लोकल: १७.५० क्विंटल | १,८२५ | १,८२५ | १,८२५ |
| तूर : १७.०० क्विंटल | ६,८०० | ७,४०० | ७,१९२ |
| उडीद : ३.५० क्विंटल | ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| बाजरी: ५९.०० क्विंटल | १,९०० | २,४०१ | २,२१२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ५,०७५ | ५,१०० | ५,०८७ |

# खत विक्रीत पारदर्शकता; ऑनलाइन बुकिंग प्रायोगिक तत्त्वावर सुरु

## खत तुटवडा आणि काळाबाजारावर आळा; केंद्राचे नवे मोबाइल ॲप चर्चेत

मुंबई । प्रतिनिधी

**रासायनिक खतांचा काळाबाजार, कृत्रिम टंचाई आणि शेतकऱ्यांची होणारी गैरसोय रोखण्यासाठी केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. शेतकऱ्यांना आता घरबसल्या मोबाईलवरून खतांचे ऑनलाइन बुकिंग करता येणार असून, त्यासाठी विशेष मोबाइल ॲप विकसित करण्यात आले आहे. महाराष्ट्रासह देशातील पाच राज्यांमध्ये या ॲपची चाचणी सुरू असून, राज्यातील पुणे जिल्ह्यातील अष्टापूर गावात हा प्रयोग यशस्वी ठरल्याचे समोर आले आहे.**

केंद्रीय खत मंत्रालयाच्या पुढाकारातून विकसित करण्यात आलेले हे ॲप सध्या महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात आणि तेलंगणा या राज्यांमध्ये चाचणी स्वरूपात वापरले जात आहे. केंद्रीय खत मंत्रालयातील अधिकारी दिशा जैन यांच्या नेतृत्वाखाली या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू आहे. २१ मेपासून महाराष्ट्रातील दोन



जिल्ह्यांत ही प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येणार असून, संबंधित जिल्हे आणि गावांची अंतिम निवड अद्याप जाहीर झालेली नाही. या नव्या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या परिसरातील खत विक्री केंद्रांमध्ये उपलब्ध असलेल्या खतसाठ्याची माहिती थेट मोबाईलवर मिळणार आहे. ॲपमध्ये शेतकऱ्याच्या २० किलोमीटर परिसरातील कृषी सेवा केंद्रांची यादी दिसणार असून, कोणत्या दुकानात कोणते खत किती प्रमाणात उपलब्ध आहे, याची अद्ययावत माहिती मिळेल. यामुळे शेतकऱ्यांना खतासाठी गावोगाव फिरण्याची किंवा रांगेत उभे राहण्याची गरज राहणार नाही. हव्या त्या दुकानातील आवश्यक खताची ऑनलाइन नोंदणी करून बुकिंग करता येणार आहे. बुकिंग पूर्ण होताच संबंधित दुकानात त्या शेतकऱ्याच्या नावावर खत राखीव ठेवले जाईल. त्यानंतर तीन ▶▶ पान २ वर

# मोदीजी जनतेच्या प्रश्नांची उत्तरे द्या-राहुल गांधी




दिल्ली । वृत्तसंस्था

**वैद्यकीय प्रवेशासाठी महत्वाची असलेल्या नीट परिक्षा २०२६ च्या पेपर लीक झाल्याने संपूर्ण देशभरातील २२ लाख तरूणांचे भविष्य वाया गेले. या प्रकाराने संपूर्ण देशभरातून एकच संताप व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय पातळीवरील राजकारण चांगलेच तापले आहे. त्यामुळे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि भाजपावर टीकेचीझोड उठविली आहे.**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक्सवरून पंतप्रधान मोदी यांना सवाल करत, वारंवार या परिक्षेचे पेपर फुटत असताना पंतप्रधान या गंभीर विषयावर गप्प का आहेत, असा सवाल करत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही यावेळी केली. राहुल गांधी भाजपावर टीका करताना केंद्र सरकारच्या कारभारावर चांगलीच टीका केली. नीट पेपर आणि परिक्षेतील गोंधळ यांची तुलना करताना राहुल गांधी यांनी सरकारचा एक ठराविक पॅटर्न असल्याचे एक्सवरील त्यांच्या खात्यावरून निदर्शनास आणून दिले. राहुल गांधी आपल्या एक्सवरील खात्यावर म्हणाले की, नीट २०२४ ला नीट परिक्षेचा पेपर फुटला. परिक्षा रद्द झाली नाही, मंत्र्यांनी राजीनामा दिला नाही. सीबीआय चौकशी सुरु झाली. एक समिती स्थापन करण्यात आली. नीट २०२६ ला पुन्हा ▶▶ पान २ वर

# नीट पेपरफुटी प्रकरणी प्रा.मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी



नवी दिल्ली । प्रतिनिधी

२०२६ पेपर फूटीप्रकरणी पुण्यातील बॉटनीच्या (वनस्पतीशास्त्र) प्राध्यापिका मनीषा गुरुनाथ मांढरे हिला केंद्रीय अन्वेषण विभागाने शनिवारी (दि. १६) अटक केली होती. तिला रविवारी (दि. १७) दिल्लीच्या विशेष सीबीआय कोर्टात हजर करण्यात आले. न्यायालयाने तिला १४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे.

### सीबीआयचे देशभरात सहा ठिकाणी छापे

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयने देशभरात सहा ठिकाणी छापे टाकले असून अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे, लॅपटॉप, बँक स्टेटमेंट आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत. जप्त केलेल्या साहित्याचे सविस्तर विश्लेषण सुरू असल्याचे सीबीआयने स्पष्ट केले आहे. आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर येथून नऊ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाच आरोपींना आधीच चौकशीसाठी सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, पुण्यात अटक करण्यात आलेल्या इतर दोन आरोपींना स्थानिक न्यायालयात हजर केले असता, त्यांना ट्रान्झिट रिमांडवर दिल्लीला हलवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयने या पेपर फुटीच्या कटाचा सखोल तपास करत आहे. मनीषा मांढरे या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांशी तिचे थेट कनेक्शन असल्याचे तपासात समोर आले आहे. मनीषा मांढरे २०२६ च्या परीक्षा प्रक्रियेत सहभागी होती. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने तिची तज्ज्ञ म्हणून नियुक्ती केली होती. यामुळे तिला बॉटनी (वनस्पतीशास्त्र) आणि झूलॉजी (प्राणिशास्त्र) च्या प्रश्नपत्रिका पाहण्याची परवानगी मिळाली होती. सीबीआयने ▶▶ पान २ वर

# २० हजार टन एलपीजी घेऊन सिमी जहाज गुजरातमध्ये दाखल



नवी दिल्ली । वृतसंस्था

तब्बल २० हजार टन लिक्विड प्रोपेन आणि ब्युटेन घेऊन निघालेले सिमी हे मालवाहू जहाज गुजरातच्या कांडला येथील दीनदयाळ बंदरात सुरक्षितपणे दाखल झाले आहे. मार्शल आयलंडचा ध्वज असलेल्या या जहाजाने १३ मे रोजी अत्यंत संवेदनशील मानली जाणारी होर्मुझ सामुद्रधुनी यशस्वीपणे पार केली. आंतरराष्ट्रीय पातळीवर ऊर्जा पुरवठा विस्कळीत झालेला असताना, हे जहाज भारतात सुरक्षितपणे पोहोचल्याने देशाच्या ऊर्जा क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला आहे. या जहाजावर २१ कर्मचाऱ्यांचा ताफा असून, यात ८ युक्रेनियन आणि १३ फिलिपिनो नागरिकांचा समावेश आहे. ▶▶ पान २ वर

# पटसंख्येच्या निकषावर शाळांचे स्थलांतर नको!

## शालेय शिक्षण विभागाकडून सुधारित धोरण जाहीर

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शाळांच्या स्थलांतर धोरणात राज्य सरकारने मोठे बदल करत नवीन कडक नियम लागू केले आहेत. कमी पटसंख्या, अपुऱ्या सुविधा आणि मनमानी स्थलांतराला लगाम घालण्यासाठी शासनाने सुधारित धोरण जाहीर केले असून, आता २० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या प्राथमिक आणि ४० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या माध्यमिक शाळांच्या स्थलांतर प्रस्तावांवर विचारच केला जाणार नाही, असे शालेय शिक्षण विभागाने



स्पष्ट केले आहे.

शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भातील सुधारित धोरण नुकतेच जाहीर केले. गेल्या काही वर्षांत वाढते शहरीकरण, महागलेल्या जागा, भाडेकरार संपुष्टात येणे, तसेच जुन्या इमारतींची दुरवस्था या कारणांमुळे अनेक शाळा स्थलांतरित होत आहेत. मात्र या प्रक्रियेत विद्यार्थ्यांची गैरसोय, अचानक बदललेले अंतर आणि अपुऱ्या सुविधा अशा तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या. त्यानंतर सरकारने स्थलांतर धोरणात बदल केला आहे. नवीन नियमानुसार शाळांना केवळ अपवादात्मक परिस्थितीत किंवा भौतिक सुविधांचा दर्जा ▶▶ पान २ वर

# मोदी सरकारमध्ये मोठे फेरबदल होण्याचे संकेत?

## २१ मेच्या 'त्या' बैठकीकडे देशाचे लक्ष



दिल्ली । वृत्तसंस्था

९ जून २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. मात्र, त्यानंतर केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळात कोणताही विस्तार किंवा फेरबदल झालेला नाही. त्यामुळे आता मोठ्या बदलांची शक्यता वर्तवली जात आहे.

अलीकडेच पार पडलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपला चांगले यश मिळाले आहे. विशेष म्हणजे पश्चिम बंगालमध्ये पक्षाने पहिल्यांदाच सरकार स्थापन केले आहे. या विजयाच्या जोरावर भाजपने आगामी विधानसभा निवडणुकांची तयारी वेगाने सुरू केली आहे. पक्षांतर्गत आणि केंद्र सरकारमध्ये मोठ्या फेरबदलांच्या चर्चांना जोर आला असून, सूत्रांच्या माहितीनुसार भाजपचे ▶▶ पान २ वर

# दादांची राष्ट्रवादी फुटीच्या उंबरठ्यावर!

## पुत्रांकडे पक्षांची सुत्रे; ज्येष्ठांमध्ये नाराजी




सुभाष चौरे

**बीड -मुंबई । अजितदादा यांच्या निधनानंतर दादाच्या राष्ट्रवादीचे शिलेदार इकडेतिकडे जातील असे वाटत असताना, सुनेत्राताईंना घाईगडबडीत अवघ्या काही दिवसात उपमुख्यमंत्री पदाची खुर्ची दिली आणि पक्ष संघटित ठेवण्याचा प्रयत्न झाला. पण काही दिवस, महिना उलटत नाही तोच अंतर्गत बाबी समोर आल्या**



**आहेत. राष्ट्रीय कार्यकारणीत असलेले प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील यांची नावे गायब झाली आणि तेथे जय पवार, पार्थ पवार आणि अन्य नावे आल्याने कदाचित ज्येष्ठ असलेल्या नेत्यांच्या मनात वेगळे प्रश्न निर्माण होणे त्यातच शरद पवारांच्या भेटी**



**होणे इतर आमदाराच्या असुरक्षित भावना निर्माण होणे म्हणजे दादाच्या राष्ट्रवादीत बरेच काही शिजतंय हे नाकारून चालणार नाही.**

२९ एप्रिल २०२६ च्या अधिकृत पत्रात, सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवडणूक आयोगाला नवीन यादी सादर केली आहे. यात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पार्थ पवार यांना राष्ट्रीय सरचिटणीस आणि जय पवार यांना राष्ट्रीय सचिव ही मोठी पदे देण्यात आली आहेत. अजितदादांच्या पश्चात पक्षात फूट पडू नये आणि नेतृत्वाची पोकळी निर्माण होऊ नये म्हणून सुनेत्रा पवारांनी थेट आपल्या दोन्ही मुलांना राष्ट्रीय पातळीवर संघटनात्मक जबाबदारी दिली आहे. पार्थ यांच्याकडे पार्टी को-ऑर्डिनेशन आणि जय यांच्याकडे राष्ट्रीय शिस्तपालन समितीचे अध्यक्ष व खजिनदार अशी महत्त्वाची खाती सोपवली आहेत. यावरून स्पष्ट होते की, पक्षाची खरी तिजोरी आणि निर्णयप्रक्रिया पवार कुटुंबाबाहेर जाऊ नये, अशी रणनीती आखली गेली आहे. या १२-१३ जणांच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या यादीतून प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ आणि दिलीप वळसे पाटील यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांची नावे ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पक्ष की परिवार? राष्ट्रवादीसमोरील मोठा प्रश्न

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष एकेकाळी पर्यायाचे, समन्वयाचे आणि अनुभवी नेतृत्वाचे प्रतीक मानला जात होता. शरद पवार यांच्या राजकीय कौशल्यातून उभ्या राहिलेल्या या पक्षाने अनेक चढ-उतार अनुभवले, सत्ता मिळवली, विरोधात बसून संघर्ष केला आणि राज्याच्या राजकारणात स्वतःची स्वतंत्र छाप निर्माण केली. मात्र आज त्याच पक्षावर अस्तित्वाचा प्रश्न उभा ठाकला आहे. कारण विरोधकांचा हल्ला किंवा जनाधारातील घट एवढेच संकट नाही, तर पक्षाच्या घरातूनच निर्माण झालेला सत्तासंघर्ष आणि वाढती घराणेशाही ही राष्ट्रवादीच्या भवितव्याला पोखरणारी सर्वात मोठी समस्या ठरत आहे.

निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या यादीने हा संघर्ष उघडपणे समोर आणला आहे. पक्षाच्या आर्थिक आणि संघटनात्मक सूत्रांवर आता जवळपास पूर्णतः पवार कुटुंबाचे नियंत्रण आले आहे. सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्याकडे पक्षाच्या बँकिंग व्यवहारांचे अधिकार देण्यात आल्याने, अनुभवी आणि ज्येष्ठ नेत्यांना केवळ दुय्यम नव्हे तर अप्रासंगिक ठरवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची भावना पक्षात निर्माण झाली आहे. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि छगन भुजबळ यांसारख्या दशकानुदशके पक्षासाठी राबलेल्या नेत्यांना बाजूला सारण्याचा हा प्रकार केवळ पदांचा फेरबदल नाही, तर पक्षातील विश्वासाचा पाया ढासळत असल्याचे संकेत आहेत. राजकीय पक्ष हा कुठल्याही एका कुटुंबाचा खाजगी उद्योग नसतो. तो हजारो कार्यकर्त्यांच्या त्यागावर, नेत्यांच्या संघर्षावर आणि जनतेच्या विश्वासावर उभा असतो. मात्र राष्ट्रवादीत सध्या जे चित्र दिसत आहे, त्यात कर्तृत्वापेक्षा नातेसंबंधांना अधिक महत्त्व दिले जात असल्याचे स्पष्ट जाणवते. पक्षातील आर्थिक निर्णयांपासून संघटनात्मक जबाबदाऱ्यांपर्यंत सर्वच गोष्टी एका कुटुंबाभोवती केंद्रीत होत असतील, तर इतर नेत्यांच्या मनात अस्वस्थता निर्माण होणे साहजिकच आहे. आनंद परांजपे यांचा राजीनामा ही त्याचीच पहिली ठळक घंटा मानावी लागेल. पक्षाच्या कठीण काळातही निष्ठा जपणाऱ्या नेत्याला सन्मानाने स्थान न देता दुर्लक्षित केले जाणे, हे केवळ एका व्यक्तीचे नुकसान नाही; तो कार्यकर्त्यांच्या मनातील विश्वास कमी करणारा संदेश आहे. ''पक्षात आता कार्यापेक्षा आडनाव मोठे झाले आहे'' अशी भावना रुजली, तर त्याचे दूरगामी परिणाम होतात. इतिहास साक्षी आहे की, ज्या पक्षांनी घराणेशाहीला अतिरेकी स्वरूप दिले, त्या पक्षांमध्ये अखेरीस फूट, गटबाजी आणि नेतृत्वावरील अविश्वास वाढत गेला. विशेष म्हणजे, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यासारख्या नेत्यांच्या पदांचा अधिकृत पत्रव्यवहारात उल्लेखही न करणे, ही साधी तांत्रिक चूक मानणे कठीण आहे. हे पक्षातील अंतर्गत शीतयुद्धाचे सार्वजनिक प्रदर्शनच मानावे लागेल. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटातही आता नवीन सत्ता केंद्रे निर्माण होत असून, पुढील पिढी जुन्या नेतृत्वाला मागे सारण्याच्या प्रयत्नात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. ही प्रक्रिया जितकी वेगाने पुढे जाईल, तितकाच असंतोष वाढण्याचा धोका आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपमध्ये संभाव्य प्रवेशाच्या चर्चा रंगू लागणेही महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपने प्रादेशिक पक्षांतील नाराज नेत्यांना आपल्याकडे खेचून स्वतःचे वर्चस्व वाढवण्याचे धोरण सातत्याने राबवले आहे. अशा वेळी राष्ट्रवादीतील अंतर्गत मतभेद अधिकच गंभीर ठरू शकतात. जर पक्षातील अनुभवी नेत्यांनाच अपमानित आणि असुरक्षित वाटत असेल, तर त्यांची निष्ठा किती काळ टिकेल, हा प्रश्न स्वाभाविक आहे. राष्ट्रवादी काँग्रेससमोरील खरे आव्हान विरोधकांचे नाही, तर स्वतःच्या घरातील असंतोषाचे आहे. केवळ पवार आडनावावर पक्ष चालू शकतो, ही समजूत धोकादायक आहे. कारण पक्ष जिवंत ठेवतात ते कार्यकर्ते, त्याग करणारे नेते आणि लोकांशी नाळ जपणारे संघटन. जर त्यांनाच दूर सारले गेले, तर पक्षाची ताकद कागदोपत्री राहते; जमिनीवर नाही. आगामी निवडणुकांच्या तोंडावर राष्ट्रवादीने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. घराणेशाहीच्या मर्यादा ओळखून अनुभवी नेतृत्वाला सन्मानाने स्थान देणे, अंतर्गत संवाद वाढवणे आणि कार्यकर्त्यांचा विश्वास पुन्हा मिळवणे, हेच पक्षाच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे. अन्यथा, ही अंतर्गत गळती थांबवणे कठीण होईल आणि एकेकाळचा प्रभावी पक्ष इतिहासाच्या उपपानावर जाऊन बसेल.

# स्नेह मेळावा:गुरुजनांचा सन्मान,२६ वर्षांनी भरली शाळा

**जालना । प्रतिनिधी**

**गांधी चमन जवळील श्री शिवाजी हायस्कूलच्या सन १९९९ -२००० मध्ये इयत्ता दहावीत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल २६ वर्षांनी रविवारी ( ता.१७) एकत्रपणे शाळेच्या आठवणींचा ऐतिहासिक,अभिनव असा शाळेला प्रोजेक्टर भेट देऊन डिजीटल रौप्य महोत्सव साजरा केला.चुकल्यावर प्रसंगी छडीचा प्रसाद देऊन शिस्त लावणाऱ्या गुरुजनांचा आदराने गौरव करत बालपणीच्या आठवणींत विद्यार्थ्यांसह शिक्षकही रमून गेले.**



### दातृत्वाचा भूमिका स्फुर्तीदायी-मा.आ.चव्हाण

शाळेचे विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वी वाटचाल करत आहेत . विद्यार्थ्यांचा समाजात नामोल्लेख होत असल्याबद्दल मन भरून येतं.असे मत संस्थेचे अध्यक्ष माजी आ.अरविंदराव चव्हाण यांनी व्यक्त केल.

सकाळी शाळेत सर्व विद्यार्थी एकत्र आले. घंटा वाजली, रंगीबेरंगी रांगोळी , फुलांची सजावट, वाजत- गाजत पुष्पवृष्टीने गुरुजनांचे स्वागत करण्यात आले.प्रार्थना, हजेरी घेण्यात आली.आय.एम.ए.च्या सभागृहात '' गुरु गौरव -स्नेह मेळावा'' कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण,मुख्याध्यापक वसंत घुगे, यांची उपस्थिती होती. गुरुजनांनी मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.''परिचय सत्र, आठवणींचा कट्टा'' मध्ये विद्यार्थ्यांनी मनोगतात शिक्षकांनी लावलेली शिस्त,मिळालेले ज्ञान, व्यक्तीमत्व विकासात शाळेची भूमिका,अशा आठवणींना उजाळा दिला.स्नेहा अग्रवाल यांच्या सोबत सामुहिक खेळाची प्रात्यक्षिके,धमाल मस्ती, गीतांवर ठेका धरत आनंद लुटला.सुत्रसंचालन आशीष रसाळ यांनी केले तर संदीप बोंदरवाल,मनोज अंभुरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ.प्रल्हाद धारूरकर,मनोज अंभुरे, आशीष रसाळ, संदीप आदींची उपस्थिती होती.

# आई-वडिलांच्या पुण्यस्मरणार्थ प्रत्येकाने दोन झाडे लावली पाहिजेत-अतुल महाराज शास्त्री

**फुलसांगवी । प्रतिनिधी**

**आई-वडिलांनी स्वतःचा देह झिजून मुलांवरती आपल्या कृपेची सावली धरलेली असते. ही सावली आई बापाच्या जाण्यानंतर दुरापास्त होते. आई-वडिलांचे पुण्यस्मरण करताना आई-वडिलांच्या सावलीची आठवण राहावी म्हणून प्रत्येक मुलाने दोन झाडे लावली पाहिजेत म्हणजे या झाडाच्या सावलीला बसले की आई-वडिलांच्या पुण्यस्मरण होईल असे प्रतिपादन हभप महंत अतुल महाराज शास्त्री यांनी मौजे फुलसांगवी येथे केले आहे.**



शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी येथील रहिवासी असलेले तथा श्री संत वामनभाऊ महाराज ट्रस्ट समितीचे माजी सचिव कै.भीमराव देवराव सानप ( गुरुजी ) यांच्या प्रथम पुण्यस्मरणाच्या निमित्ताने सानप परिवारांच्या वतीने हभप.महंत अतुल महाराज शास्त्री ( संत भगवान बाबा संस्थान तागडगाव ) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनाच्या माध्यमातून महाराजांनी वृक्ष लागवडीचा दिव्य संदेश दिला आहे . पुण्यस्मरणाच्या निमित्ताने ज्या पद्धतीने आपण धार्मिक कार्यक्रम करत आहोत या कार्यक्रमा बरोबरच आई-वडिलांच्या स्मरणार्थ प्रत्येकाने वृक्षारोपण केली पाहिजे. आपल्या घरासमोर शेतामध्ये ज्या ठिकाणी हे झाड काढण्याची पुन्हा वेळ येणार नाही अशा ठिकाणी झाडे लावली पाहिजेत. आपण या झाडाच्या सावलीला ज्या ज्या वेळी बसू त्यावेळी निश्चितच आपल्याला आपल्या आई-वडिलांची कृपा छाया आपल्या डोक्यावरती असल्याची जाण होईल आणि त्यांच्या पुण्याचे स्मरण होईल यासाठी दोन झाडे लावली पाहिजेत असे प्रतिपादन यावेळी अतुल शास्त्रींनी केले आहे. या वेळी जि प सदस्य रामराव खेडकर, सरपंच भास्करराव सानप, दिलीपराव सानप, माऊली मार्कड हभप. बळीराम महाराज तळेकर, पांडुरंग महाराज तळेकर, बंडू महाराज तळेकर,विकास महाराज जायभाये, महादेव महाराज इंगळे, अर्जुन महाराज नांगरे आदींची उपस्थिती होती.

### एक झाड जगण्यासाठी एक झाड मारण्यासाठी

माणसाने जीवनामध्ये दोन झाडे निश्चित लावली पाहिजेत आयुष्यभर निसर्गामधून मोफत ऑक्सिजन घेतो आपल्या जगण्यासाठी याच झाडाकडून आपल्याला ऑक्सिजन मिळत असतो या ऑक्सिजन साठी म्हणजे आपल्या जगण्यासाठी एक झाड लावा. आणि आपल्या मरणानंतर एका झाडाच्या लाकडामध्ये आपल्याला जाळले जाते त्याही वेळी निसर्गातले एक झाड कमी झालेलं असतं म्हणून आपल्यासाठी आपण एक झाड लावले पाहिजे.

### वाढते तापमान धोक्याची घंटा

निसर्गामधील आपण वृक्षतोड केल्याने निसर्गाचे संतुलन बिघडत चालले आहे. यामुळे आपल्याला निसर्गाकडून वेगवेगळ्या समस्या निर्माण होताना दिसत आहेत. निसर्गातील वृक्षाचे प्रमाण कमी झाल्याने निसर्गाचे संतुलन बिघडून प्रचंड प्रमाणात तापमान वाढले आहे याचा दुष्परिणाम सध्या महाराष्ट्र भोगत आहे. याची जाण ठेवून तरी आपल्याला आता सतर्क होऊन झाडे लावणे आणि जगवणे काळाची गरज बनली आहे.

# राज्यस्तरीय सौंदर्य कला पुरस्काराने सौ.पूजा शेळके यांचा गौरव

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**मेहनत, जिद्द, कला आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर स्वप्नांना यशाची सुंदर किनार मिळते, याची प्रचिती माजलगाव तालुक्यातील नाकलगावच्या सौ. पूजा संभाजी शेळके यांनी करून दिली आहे. बी. द.चेंज फाउंडेशन, शिर्डी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ''राज्यस्तरीय सौंदर्यकला पुरस्कार २०२६'' मध्ये सौ. पूजा शेळके यांना ''बेस्ट हेअर स्टायलिस्ट'' हा मानाचा पुरस्कार प्रदान करून रविवारी गौरविण्यात आले.**



सौंदर्य क्षेत्रात त्यांनी केलेले उत्कृष्ट कार्य, नावीन्यपूर्ण शैली, ग्राहकांप्रती असलेली आत्मीयता आणि आपल्या व्यवसायातील सचोटी याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. ग्राहकांचा विश्वास हेच आपल्या कामाचं सर्वात मोठं बळ मानत त्यांनी सदैव दर्जेदार सेवा देण्यावर भर दिलेला आहे. याची दखल बी.द. फाऊंडेशन ने घेत हा सन्मान बहाल केला. ''कामात प्रामाणिकपणा आणि मनात सेवा भाव असेल, तर यश आपोआप आपल्या पाठीशी उभं राहतं,'' हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. अनेक अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या मेहनतीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे केवळ कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण परिसराचा अभिमान उंचावला आहे. सौंदर्य क्षेत्रात सचोटी, गुणवत्ता आणि ग्राहकांचा विश्वास जपणाऱ्या पूजा शेळके या अनेक महिलांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. ''संघर्षाशिवाय यश नाही आणि मेहनतीशिवाय ओळख नाही,'' या विचारांना साकार करत त्यांनी मिळवलेला हा सन्मान अनेकांना नवी प्रेरणा देणारा ठरत आहे. हा पुरस्कार सोहळा १७ मे २०२६ रोजी शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडला.

# बदलीसाठी राजकीय नेत्यांचे उंबरठे झिजवल्यास होणार निलंबन

## पोलीस अधीक्षक काँवत यांची कर्मचाऱ्यांना तंबी

**पाटोदा । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील पोलीस कर्मचाऱ्यांनी ,अधिकाऱ्यांनी बदलीसाठी किंवा प्रतिनियुक्तीसाठी राजकीय नेत्यांच्या शिफारशी आणल्यास त्यांचे थेट निलंबन केले जाईल अशी तंबी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पोलीस अधिकारी आणी कर्मचाऱ्याला दिली आहे.**

बीड जिल्हा पोलीस दलात शिस्त, पारदर्शकता आणि गुन्हेगारांवर जरब बसवण्यासाठी ओळखले जाणारे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी नुकताच एक धडाकेबाज निर्णय घेतला आहे. ''बदलीसाठी राजकीय नेत्यांचे उंबरठे झिजवून दबाव आणल्यास संबंधित पोलीस अंमलदारावर थेट शिस्तभंगाची कारवाई केली जाईल,'' असा कडक इशारा त्यांनी दिला आहे. त्यांच्या या भूमिकेचे पाटोदा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून जोरदार स्वागत होत आहे. बीड जिल्ह्याची कमान हाती घेतल्यापासून त्यांनी गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी कडक पावले उचलली आहेत. बदलीसाठी कोणत्याही लोकप्रतिनिधीचा फोन किंवा बाह्य दबाव आणल्यास थेट कारवाईचा इशारा दिला आहे. तसेच वादग्रस्त पार्श्वभूमी असलेल्या किंवा नुकतेच निलंबनातून मुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे.बीड जिल्ह्यातील पोलिसांमधील जातीय भेदभाव संपवण्यासाठी त्यांनी पोलीस अधीक्षकांपासून ते कॉन्स्टेबलपर्यंत सर्वांच्या वर्दीवरील नेमप्लेटवरून 'आडनाव' हटवून केवळ स्वतःचे नाव लिहिण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयाची राज्यभर चर्चा झाली. शिस्तीच्या बाबतीत ते स्वतःच्या खात्यातील कर्मचाऱ्यांनाही सोडत नाहीत. त्यांच्या शासकीय निवासस्थान परिसरात गांजा ओढणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर त्यांनी स्वतः थेट निलंबनाची कडक कारवाई केली होती.नागरिकांच्या तक्रारी थेट पोलीस अधीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचण्यासाठी आणि हरवलेले मोबाईल शोधण्यासाठी त्यांनी क्यूआर कोड आणि विशेष डिजिटल पोर्टलची अंमलबजावणी केली आहे.पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या या पारदर्शक आणि कडक भूमिकेमुळे प्रामाणिक आणि अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांना न्याय मिळणार आहे. राजकीय वशिला आणि अंतर्गत दबावाच्या संस्कृतीला छेद देणाऱ्या या निर्णयामुळे बीड जिल्हा पोलीस दलाची ओळख संपूर्ण राज्यात एक 'आदर्श, पारदर्शक आणि शिस्तप्रिय पोलीस दल' म्हणून नक्कीच दृढ होईल, असा विश्वास पाटोदा परिसरातील नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## पान १ वरून...

### खत विक्रीत पारदर्शकता; ऑनलाइन

दिवसांच्या आत शेतकरी दुकानात जाऊन रोख अथवा ऑनलाइन पद्धतीने पैसे भरून खत ताब्यात घेऊ शकणार आहे. राज्यात दरवर्षी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खतांचा तुटवडा, काळाबाजार, अतिरिक्त दर आकारणी आणि कृत्रिम टंचाईच्या तक्रारी वाढत असतात. अनेक वेळा शेतकऱ्यांना आवश्यक खत मिळवण्यासाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागते. काही ठिकाणी खत विक्रीसोबत अनावश्यक औषधे किंवा इतर साहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जाते, अशाही तक्रारी येतात. ऑनलाइन बुकिंग प्रणालीमुळे खत वितरणात पारदर्शकता येईल, असा विश्वास कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. कोणत्या विक्रेत्याकडे किती खतसाठा आहे, याची नोंद डिजिटल स्वरूपात उपलब्ध राहणार असल्याने काळाबाजार आणि अनुदानित खतांच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवणे सोपे होणार आहे. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील अष्टापूर गावात या ॲपची प्राथमिक चाचणी घेण्यात आली. स्थानिक शेतकरी, कृषी सेवा केंद्र चालक आणि क्षेत्रीय कृषी कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे. शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध होण्यास मदत होत असल्याने ही प्रणाली राज्यभर लागू करण्याची मागणीही पुढे येत आहे.

**डिजिटल कृषी व्यवस्थेकडे आणखी एक पाऊल**

केंद्र सरकारने यापूर्वी पीक विमा, ई-नाम बाजारपेठ, ड्रोन तंत्रज्ञान, डिजिटल जमीन नोंदी यांसारख्या विविध योजनांद्वारे कृषी क्षेत्राचे डिजिटायझेशन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून खत विक्रीची ऑनलाइन प्रणाली महत्त्वाची मानली जात आहे. राज्यात हा प्रयोग यशस्वी ठरल्यास आगामी खरीप हंगामापासून संपूर्ण महाराष्ट्रात ही सुविधा लागू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ वाचण्यासोबतच खत वितरण व्यवस्थेत अधिक शिस्त आणि पारदर्शकता निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

-----------

### नीट पेपरफुटी प्रकरणी प्रा.मांढरेला

स्पष्ट केले आहे की, एप्रिल २०२६ दरम्यान मनीषा मांढरे यांच्या माध्यमातून परीक्षेला बसणाऱ्या संभाव्य विद्यार्थ्यांशी संपर्क साधला होता. पुण्याच्या निवासस्थानी विद्यार्थ्यांसाठी विशेष कोचिंग क्लासेस घेतले होते. या क्लासेसदरम्यान त्यांनी बॉटनी (वनस्पतीशास्त्र) आणि झूलॉजी (प्राणीशास्त्र)चे अनेक प्रश्न आधीच उघड केले. हे प्रश्न विद्यार्थ्यांना त्यांच्या वह्यांमध्ये व पाठ्यपुस्तकात नोंदवून घेण्यास सांगितले होते. त्यांनी दिलेले बहुतांश प्रश्न ३ मे रोजी घेतलेल्या (आणि आता रद्द झालेल्या) मुख्य - २०२६ च्या प्रश्नपत्रिकेशी तंतोतंत जुळणारे होते. सीबीआयने आरोपीच्या कोठडीची मागणी करताना न्यायालयास सांगितले की, नीट पेपर फुटीच्या मागे खूप मोठे रॅकेट असून, अनेक बड्या नावांचा यात समावेश असण्याची शक्यता आहे. न्यायालयाने सीबीआयचा हा युक्तिवाद मान्य करत मनीषाला १४ दिवसांची सीबीआय कोठडी मंजूर केली आहे.

-----------

### मोदीजी जनतेच्या प्रश्नांची

पेपर फुटला, परिक्षा रद्द झाली. मंत्री अजूनही पदावरच आहे. त्यांनी अद्याप राजीनामा दिलेला नाही. पुन्हा सीबीआय चौकशी सुरु झाली. आता आणखी एक समिती स्थापन केली जाईल. शिक्षण मंत्र्यांना तात्काळ मंत्री पदावरून हटविण्याची मागणी त्यांनी केली.

-------------

### मोदी सरकारमध्ये मोठे

राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नबीन पक्षांतर्गत बदल करण्याच्या तयारीत आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर बहुमत मिळाले नव्हते. त्यानंतर जेडीयू आणि तेलुगु देसम पक्ष (टीडीपी) सारख्या मित्रपक्षांच्या मदतीने केंद्रात सरकार स्थापन केले. भाजप नेत्यांच्या म्हणण्यानुसार, आगामी निवडणुकांच्या रणनीतीसाठी हा संघटनात्मक बदल अत्यंत महत्त्वाचा ठरेल. भाजप सध्या २०२७ मधील विधानसभा निवडणुका, राष्ट्रपती निवडणूक आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकांची तयारी आतापासूनच सुरू करत आहे. २१ मे २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिपरिषदेची महत्वाची बैठक होणार आहे. या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सूत्रांच्या मते, या बैठकीत केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळात फेरबदल आणि विस्तार करण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. सध्याच्या केंद्रीय मंत्र्यांच्या जागी काही प्रदेशाध्यक्ष किंवा वरिष्ठ नेत्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. अनुभवी नेत्यांना पक्ष विस्तार आणि संघटनात्मक जबाबदारी दिली जाऊ शकते. आगामी निवडणुकीसाठी मजबूत नेतृत्व आणि प्रभावी रणनीतीची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेतला जाईल. भाजपने निवडणुकीतील यशस्वी कामगिरीचा फायदा घेत पक्ष आणि सरकार दोन्ही पातळ्यांवर मजबूत आणि नवीन नेतृत्व उभे करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. २१ मे रोजी होणारी बैठक पक्षाची भविष्यातील दिशा ठरवण्यासाठी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. युवा, महिला आणि नव्या चेहऱ्यांना प्राधान्य देऊन भाजप २०२७ आणि २०२९ च्या मोठ्या लढायांची तयारी करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

--------------

### पटसंख्येच्या निकषावर

उंचावण्यासाठीच स्थलांतराची परवानगी दिली जाणार आहे. धोकादायक इमारत, नैसर्गिक आपत्ती, प्रकल्पबाधित परिस्थिती, भाडेकरार संपुष्टात येणे किंवा स्वतःच्या जागेत स्थलांतर अशी कारणे ग्राह्य धरली जाणार आहेत. शासनाने स्थलांतरासाठी कडक अटी घातल्या असून, १०० टक्के आधार प्रमाणीकरण, आरटीईनुसार सुविधा, जुन्या-नव्या सुविधांची छायाचित्रांसह तुलना, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र आदी कागदपत्रे बंधनकारक करण्यात आली आहेत. याशिवाय प्राथमिक शाळेचे स्थलांतर मूळ ठिकाणापासून ५ किलोमीटर, माध्यमिक शाळेचे १० किलोमीटर आणि उच्च माध्यमिक शाळेचे २० किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावर करता येणार नाही. तात्पुरत्या स्थलांतरासाठी मात्र तीन किलोमीटरची मर्यादा ठेवण्यात आली आहे. अनुदानित शाळांच्या स्थलांतरावेळी विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याची जबाबदारी संस्थांवर टाकण्यात आली असून, स्थलांतरामुळे शैक्षणिक आणि भौतिक सुविधांचा दर्जा वाढणे आवश्यक असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

------------

### २० हजार टन एलपीजी घेऊन

सध्याच्या आव्हानात्मक परिस्थितीत होर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीपणे पार करणारे सिमी हे ११ वे एलपीजी जहाज आहे. या जहाजाचा प्रवास सुरक्षित करण्यात भारताच्या नौवहन महासंचालनालयाने महत्त्वाची भूमिका बजावली. परराष्ट्र मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, आणि पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयासोबत केलेल्या समन्वयामुळेच हे जहाज सुरक्षितपणे भारतात आणणे शक्य झाल्याची माहिती अधिकार्यांनी दिली आहे. गेल्या ७५ दिवसांपेक्षा जास्त काळापासून होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर प्रचंड ताण आला आहे. याचा फटका भारतालाही बसला असून, गेल्या काही महिन्यांत देशातील कच्च्या तेलाचा साठा तब्बल १५ टक्क्यांनी घटला आहे. केपलर या कमोडिटी ॲनालिटिक्स फर्मच्या आकडेवारीनुसार, मध्य पूर्व संघर्ष सुरू होण्यापूर्वी, म्हणजेच फेब्रुवारीच्या शेवटी भारताचा एकूण कच्च्या तेलाचा साठा १० कोटी ७० लाख बॅरल्स होता. यात आता घट झाली असून तो ९ कोटी १० लाख बॅरल्सवर आला आहे. यामध्ये धोरणात्मक राखीव साठा, रिफायनरी साठा आणि व्यावसायिक साठ्याचा समावेश आहे.

------------

### दादांची राष्ट्रवादी फुटीच्या

गायब आहेत. यावरून राजकीय वर्तुळात दोन मोठे प्रवाह सुरू आहेत. अजितदादांच्या निधनानंतर प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून पक्षाचे अधिकार स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केला होता, असा आरोप रोहित पवारांनीही केला होता. त्यामुळे सीनियर नेत्यांना बाजूला सारून सुनेत्रा पवारांनी पूर्णपणे आपल्या विश्वासातील आणि तरुण चेहऱ्यांची नवी फळी उभी केल्याचे दिसते. दुसरी बाजू ही केवळ रोजच्या प्रशासकीय कामांसाठीची कार्यालयीन पदाधिकारी यादी असू शकते, मुख्य राजकीय कार्यकारिणी वेगळी असू शकते. परंतु, एवढ्या मोठ्या नेत्यांची नावे त्यात नसणे हे अंतर्गत नाराजीचे स्पष्ट संकेत आहेत. पक्षाच्या नव्या यादीत स्थान नसणे आणि त्याच काळात प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेणे, याला महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठे महत्त्व आहे.

अजितदादांच्या निधनानंतर या गटाला एकत्र ठेवणारा भक्कम चेहरा राहिलेला नाही. भाजपसोबतच्या महायुतीमध्ये जागावाटप किंवा अंतर्गत दबावामुळे हे ज्येष्ठ नेते सध्या अस्वस्थ आहेत. त्यामुळे भविष्यात स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी हे नेते पुन्हा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात घरवापसी करू शकतात किंवा त्यांच्याशी गुप्त तडजोड करत असल्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. त्यातच आनंद परांजपे यांनी पक्षाचा राजीनामा देणे म्हणजे या पडद्यामागच्या घडामोडींचाच एक भाग मानला जात आहे. रोहित पवारांनी केलेला हा दावा राष्ट्रवादीतील आमदार किती अस्थिर आहेत हे दाखवतो. अजितदादांच्या नावावर निवडून आलेले किंवा त्यांच्यासोबत गेलेले अनेक आमदार आता संभ्रमात आहेत. राष्ट्रवादीतील लोकप्रिय आणि जनसामान्यात नेता माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी परळीतील एका कार्यक्रमात बोलताना मनातील खंत व्यक्त केली की, ''मला पक्षातून बाहेर काढण्याचा प्रयत्न झाला, तरीही मी जात-पात सोडली नाही, याचा अर्थ काय? धनंजय मुंडे हे अजितदादांचे अत्यंत कट्टर समर्थक होते. परंतु दादांच्या जाण्यानंतर पक्षात निर्माण झालेल्या नव्या समीकरणांमुळे, त्यांना साईडलाईन केले जात असल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली असावी. थोडक्यात सांगायचे तर, अजित पवारांनंतर या गटाला बांधून ठेवणारा फेव्हिकॉल निघून गेला आहे. सुनेत्रा पवारांनी कुटुंबाकडे (पार्थ आणि जय) सूत्रे देऊन पक्ष ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला असावा परंतु ज्येष्ठ नेत्यांची नाराजी आणि आमदारांची अस्थिरता पाहता, हा गट भविष्यात विखुरला जाण्याची किंवा मूळ शरद पवार गटात विलीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यांना शरद पवारांकडे जागा नाही ते थेट भाजप किंवा सेनेत देखील जाऊ शकतात. असो पण शरद पवारांनी काँग्रेस सोडून राष्ट्रवादीची जेव्हा स्थापना केली तेव्हा ते स्वतः सह प्रफुल पटेल, पी ए संगमा आणि तारेख अन्वर या ज्येष्ठांना कार्यकारणीत घेतले. घरातील एकही व्यक्ती नव्हता. त्यावेळी अजित दादा सुप्रिया ताई होत्याच ना पण इथं सुनेत्राताई यांनी काय साध्य केले आणि राष्ट्रीय कार्यकारणी कोणाच्या विचाराने तयार केली, हे सांगणे कठीण आहे. पण यामुळे पक्षाचे न भरून येणारे नुकसान होऊ शकते, हे मात्र नाकारता येणार नाही.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. १८ मे २०२६


## थोडक्यात

### साऊ एकल महिला समितीचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील ग्रामपंचायत स्तरावर विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित व इतर एकल महिलांचे सर्वेक्षण जिल्हा परिषदेने केले आहे. त्याच धर्तीवर बीड शहरातील एकल महिलांचेही सर्वेक्षण करून त्यांना रोजगार व स्वावलंबनासाठी मदत करावी, अशी मागणी साऊ एकल महिला समिती, महाराष्ट्र राज्य, बीड जिल्हा शाखेच्या वतीने करण्यात आली.

या मागणीसंदर्भात समितीचे मार्गदर्शक प्राचार्य डी. जी. तांदळे, जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शहरातील अनेक एकल महिला आर्थिक व सामाजिक अडचणींना सामोरे जात असल्याकडे लक्ष वेधण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सर्वेक्षणाच्या माध्यमातून संबंधित महिलांना रोजगार मेळावे, कौशल्य विकास प्रशिक्षण, बचत गट, उद्योग-व्यवसाय मार्गदर्शन तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ उपलब्ध करून देता येऊ शकतो. महिला व बालकांच्या सक्षमीकरणासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची ठरेल, असे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. शासनाच्या २९ मार्च २०२२ च्या निर्णयानुसार महिला व बालकल्याणासाठी निधी खर्च करण्याची तरतूद आहे. त्यातील काही निधी एकल महिलांच्या रोजगार, व्यवसाय आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करण्यात यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. बीड शहरातील झोपडपट्ट्या व विविध परिसरांतील गरजू एकल महिलांचे तातडीने सर्वेक्षण करण्यात यावे, यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले.

### श्री तुळजाभवानी अर्बनच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत कर्जदाराच्या वारसांना दिलासा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी शाखा सिरसाळा यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत कर्जदाराच्या वारसांना दिलासा देणारी मदत करण्यात आली.



भिलेगाव ता. परळी येथील रहिवासी कै. हाराळे देवराव अच्युत यांनी संस्थेकडून २,००,००० चे पर्सनल लोन घेतले होते. दरम्यान, कॅन्सरशी झुंज देत असताना त्यांचे दुर्दैवी निधन झाले. संस्थेमार्फत संबंधित कर्ज खात्यावर विमा संरक्षण काढण्यात आले होते.त्या अनुषंगाने विमा कंपनीकडून २,१०,००० चा विमा दावा मंजूर करण्यात आला. सदरील रक्कमेमधून कर्ज खात्याची पूर्तता करून संस्थेच्या वतीने वारसांना कर्जमुक्तीचे निल पत्र प्रदान करण्यात आले.यावेळी संस्थेच्या या कार्याबद्दल वारसांनी समाधान व्यक्त करत संस्थेचे आभार मानले. तसेच संकटकाळात सदस्यांच्या पाठीशी उभे राहण्याची संस्थेची भूमिका कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# जिल्हाधिकारी जॉन्सन व आ.सोळंके यांच्या हस्ते भगवान पुरुषोत्तमाची शासकीय महापूजा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

हिंदू धर्मियात महत्त्वाच्या अशा मानल्या जाणाऱ्या अधिक मासास (धोंड्याचा महिन्यास) दि १७ मे रविवार रोजी पासून प्रारंभ झाला असून,यानिमित्त तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे भगवान विष्णूचा अवतार असलेल्या भगवान पुरुषोत्तम मंदिरात दि १७ मे रविवार रोजी सकाळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते महापूजा संपन्न झाली आहे.



बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात गोदावरी नदीकाठी पुरुषोत्तमपुरी हे ३००० लोकसंख्येचे गाव आहे.येथे नदीकाठापासून अलीकडे तेराव्या शतकात राजा रामदेवराय यांच्या काळात विष्णूचा अवतार भगवान पुरुषोत्तमाचे हेमाडपंथी मंदिर दगडविटांनी बांधलेले होते, सध्या या मंदिराच्या पुनर्निर्माणाचे काम मागील दोन वर्षांपासून सुरू आहे.येथे काळ्या पाषाणात भगवान पुरुषोत्तमाची उभी मूर्ती,हाती शंख-चक्र-गदा-पद्म धारण केलेली तीन फूट उंचीची आहे. पुरातन काळात या परिसरात दंडकारण्य होते. तेथे शार्दूल नावाचा राक्षस रयतेला त्रास देत असे.भगवान विष्णूने पुरुषोत्तमाचा अवतार धारण करून आपल्या हातातील चक्राने राक्षसाचा वध केला व ते चक्र गोदावरी नदीत धुऊन काढल्याने या तीर्थाला चक्रतीर्थ असे नाव पडले.धोंडे महात्म्य या पवित्र ग्रंथात उल्लेखलेल्या बारा महिन्यांना बारा भगवंत स्वामी आहेत.मात्र सर्वांचा मिळून बनलेल्या अधिक मासाचे स्वामित्व कोणीच स्वीकारत नसल्याने ते पुरुषोत्तमाने स्वीकारले.त्यामुळे दर तीन वर्षांनी येणारा अधिक मासात (धोंड्याचा महिना) पुरुषोत्तम दर्शनास महत्त्व आहे.आता हे मंदिर जीर्णोद्धारासाठी पाडलेले आहे.दि १७ मे रविवार रोजी पासून संपूर्ण महिनाभर येथे यात्रा भरणार आहे. या महिन्यातच पुरुषोत्तम दर्शनाचे महत्त्व असल्याने त्यासाठी.देशभरातून लाखोच्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात.दि १७ मे रविवार रोजी सकाळी ९:०० वाजता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आमदार प्रकाश सोळंके यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते भगवान पुरुषोत्तमाची शासकीय महापूजा संपन्न झाली.यावेळी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,तहसीलदार संतोष रुईकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे,माजी समाज कल्याण सभापती कल्याण आबुज यांची उपस्थिती होती.

**पहिल्याच दिवशी दर्शन रांगेत भावीकाचे सोने चोरीला**

निलंगा येथील पत्रकार बिराजदार पुरुषोत्तमपुरी येथे दर्शनसाठी सहकुटुंब आले असता ४ ते ५ तोळे सोन्याचे दागिने दर्शन घेताना चोरीस गेले आहे.याप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे भारतातील एकमेव भगवान पुरुषोत्तमाचे मंदिर असून, ही बाब संपूर्ण मतदारसंघासाठी अभिमानास्पद आहे. अधिकमासाच्या कालावधीत देशभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. दि १७ मे रविवार रोजी सकाळी अधिकमासाच्या प्रारंभी भगवान पुरुषोत्तमाची विधिवत पूजा व धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

-आ.प्रकाश सोळंके

## संकल्प विद्या मंदिर चा यशाचा 'संकल्प' सिद्ध पहिल्याच वर्षी दहावीचा १०० टक्के निकाल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील नावाजलेली आणि उपक्रमशील शाळा म्हणून नावलौकिक मिळवलेल्या संकल्प विद्या मंदिरने आपल्या यशाची परंपरा इयत्ता दहावीच्या निकालातही कायम राखली आहे. पहिल्याच वर्षी शाळेच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा १०० टक्के निकाल लागून शाळेने गुणवत्तेचा झेंडा फडकवला आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि मूलभूत सोयी-सुविधांची उणीव असतानाही, विद्यार्थ्यांनी जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून, शाळेच्या निकालाने अंबाजोगाई शहरासह जिल्ह्यात कौतुक होत आहे. गुणवंत विद्यार्थ्यांची यादीत शाळेतून प्रथम येण्याचा मान कु. जगताप गौरी तुकाराम व कु. थोरात अपेक्षा अण्णासाहेब यांनी ९४.००% गुण मिळवून पटकावला. तर कु. पवळे साक्षी वंदना रामराजा हिने ९२.८०% गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच कदम अमृता अरविंद हिने ८८.४०% गुणासह तृतीय क्रमांक इतरही यशस्वी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट गुण मिळवलं त्यामध्ये चव्हाण पार्थ अलका पंडित



(८५.६०%)महाजन श्रेया रागिणी सचिन (८५.००%)बनाळे रुद्र रेखा उत्तरेश्वर (८४.८०%)कदम आकांक्षा संगीता राम (८४.६०%)गीते आदित्य कविता महेश (८४.२०%)नखाते गौरी राणी अशोक (८३.६०%)नवघरे ओमकार बालासाहेब (८०.८०%)देशमुख प्रथमेश उमेश (८०.८०%)गीते सार्थक मीरा समाधान (७९.४०%)पाटील रुद्राक्ष मालती प्रदीप (७९.४०%)थोरात आशिष कल्पना सचिन (७७.४०%) नवघरे अभिषेक प्रियंका अशोक (७७.२०%)केंद्रे ओमकार लक्ष्मी संजय (७५.८०%)वाकडे शिवम सुवर्णा गोविंद (७५.६०%) विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. कैलास भागवत चोले, मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर.एस., वर्गशिक्षिका श्रीमती नायक पी.एच. यांच्यासह सर्व शिक्षक वृंद आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाल्यानेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## पान ६ वरुन...

### कुऱ्हाडीने गंभीर मारहाण

पोलीस, अतिरिक्त शल्य चिकित्सक बीड (डॉक्टर), फिर्यादीचे नातेवाईक, शासकीय पंच इत्यादींची साक्ष नोंदविण्यात आली व सरकार पक्षाने आपला युक्तीवाद सादर केला.

दरम्यान आरोपीच्या बाजूने गेवराई येथील विधीज्ञ ॲड. गणेश एम. कोल्हे यांनी न्यायालयात प्रभावी व खंबीर युक्तीवाद करत उपलब्ध पुरावे, साक्षी आणि कागदपत्रांच्या आधारे आरोपीची कायदेशीर बाजू भक्कमपणे मांडली. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद व उपलब्ध पुरावे विचारात घेत मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड यांनी आरोपीस जबर मारहाणीच्या गुन्ह्यातून पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले.

### स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी

परीक्षा नियोजन या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अभ्यासाची सुरुवात आणि विषयांची विभागणी कशी करावी., वेळेचे व्यवस्थापन दररोजचा अभ्यास आणि प्रत्यक्ष परीक्षेतील वेळेचे नियोजन, स्वतःच्या अनुभवातून त्यांनी परीक्षेत प्रश्नांना सामोरे जाण्याची अचूक पद्धत समजावून सांगितली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. निलेश बहादूरे आणि प्रा. एस. एम. कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. चव्हाण सी. एच., प्रा. गरकळ एम. बी., प्रा. चौधरी एस. एस., प्रा. सातपुते व्ही. एस. आणि प्रा. गाडे आकाश यांनी परिश्रम घेतले. प्रथम वर्ष अभियांत्रिकीची विद्यार्थिनी प्राची हातवटे हिने आभार मानले.

### कोर्टाच्या निकालालाही

न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. न्यायालयाचा निकाल असतानाही जर शेतकऱ्यांना स्वतःच्या जमिनीत सुरक्षितता मिळत नसेल, तर सामान्य नागरिकांनी न्यायासाठी कुणाकडे पाहायचे? असा सवालही आता उपस्थित होत आहे. सदर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई होणार का, तसेच तक्रारदार कुटुंबाला संरक्षण मिळणार का, याकडे आता धोंडराईसह संपूर्ण गेवराई तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### युवकांसाठी 'अमृत'चे

नायर, नायडू, पटेल, पाटीदार, बंगाली, जाट, गुजराती, सिंधी, ठाकूर, राजपूत, सेनगुनथर, कोमटी, कानबी आदी समाजातील उमेदवार पात्र राहणार आहेत. अर्जदाराचे वय १८ ते ५५ वर्षांदरम्यान असावे, किमान १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक असून कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असावे. शेतकरी कुटुंबातील उमेदवारांना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. अर्जासोबत पासपोर्ट साईज फोटो, सही, उत्पन्न प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅनकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला (ढउ), १२ वी पुढील गुणपत्रिका, फिटनेस प्रमाणपत्र व स्वयंघोषणापत्र जोडणे आवश्यक आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन अमृत बीड जिल्हा कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी‌ु.ारहरर्ीींी.ीस.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा अमृत बीड जिल्हा कार्यालय, अथर्व अभ्यासिकेच्या वर,वाघ नेत्रालय शेजारी, नवगण कॉलेज रोड बीड येथे संपर्क साधावा. संपर्क क्रमांक ७३९१०६५४६८. असे आवाहन विशाल अशोकराव जोशी (जिल्हा व्यवस्थापक) दिगंबर भाऊदेव जोशी (जिल्हा उपव्यवस्थापक) - यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधा व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार - आ.सुरेश धस

पाटोदा । प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधा व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार असून पालकांनी पाल्यांच्या भविष्यासाठी त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असून मोबाईलचा होणारा अती वापर थांबविण्याचे आवाहन आ.सुरेश धस यांनी यावेळी केले. आ. सुरेश (आण्णा) धस प्रतिष्ठान, अंमळनेर सर्कल यांच्या वतीने आयोजित ''गुणगौरव व वेध भविष्याचा करिअर मंत्र'' हा प्रेरणादायी कार्यक्रम शुक्रवारी कुसळंब येथील श्री खंडेश्वर मंदिर परिसरात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थी तसेच पोलिस व महसूल प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थी, एनएमएस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. माऊली जरांगे यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी, स्पर्धा परीक्षा, प्रशासकीय सेवा तसेच उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक दिशा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बोलताना आ. सुरेश धस यांनी रद्द झालेली परीक्षा पुढील महिन्यात २१ तारखेला घेण्याचा निर्णय घेतल्याबद्दल केंद्र व राज्य सरकारचे आभार मानले. या निर्णयामुळे विद्यार्थी व पालकांमधील संभ्रम दूर होऊन समाधानाचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी ''मिशन जरेवाडी पॅटर्न'' या शैक्षणिक उपक्रमाचा विशेष उल्लेख केला.विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, शिक्षकांमध्ये शैक्षणिक कार्याप्रती आपुलकी निर्माण करणे आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावणे या उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात



आले असल्याचे आ.धस म्हणाले. तत्कालीन कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी हा पॅटर्न संपूर्ण बीड जिल्ह्यात राबवून शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व आकलन क्षमतेत सकारात्मक वाढ झाल्याचेही त्यांनी सांगितले.पुढे बोलताना त्यांनी श्री आणि श्री योजनांच्या धर्तीवर मतदारसंघात ''आमदार श्री शाळा'' आणि ''आमदार श्री शिक्षक'' या संकल्पना राबविण्यात येणार असल्याची घोषणा केली. गुणवत्तापूर्ण शाळा, उत्कृष्ट शिक्षक आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्थांचा सन्मान करून त्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. किशोरवयीन मुला-मुलींमध्ये मोबाईलचा वाढता वापर चिंतेचा विषय असल्याचे सांगत त्यांनी पालकांना सजग राहण्याचे आवाहन केले. अभ्यासासाठी मोबाईलचा उपयोग आवश्यक असला तरी त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांचे लक्ष शिक्षणापासून विचलित करू शकतो, असे ते म्हणाले. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यात पालक विद्यार्थ्यांवर बारकाईने लक्ष ठेवतात, त्यामुळे त्या भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता राज्यात अव्वल असल्याचे उदाहरण त्यांनी दिले. त्याच धर्तीवर आष्टी विधानसभा मतदारसंघातही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधा व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल,असा शब्द त्यांनी दिला.महिलांच्या आरोग्याबाबतही त्यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली. आगामी काळात महिलांसाठी विविध आरोग्य तपासणी शिबिरे, कॅन्सर तपासणी मोहीम तसेच विविध आजारांवरील जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांचे आरोग्य सुदृढ राहणे हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसीलदार निलावाड साहेब, व्याख्याते वसंत हंकारे, गटशिक्षणाधिकारी हनुमंत गव्हाणे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक संदीप पवार, आर्टिफिशियल इंटेलिजन्स विश्लेषक विक्रांत पवार, बाजार समिती उपसभापती किरण पाटील, सय्यद अब्दुल्ला, माऊली जरांगे, संदीप पवार सर,गवृहाणे साहेब बी ई ओ,सरपंच पोपट शेलार, सुरेखा खेडकर दिलीप भराटे,आशोक जेधे, जब्बार पठाण, पत्रकार पोपट कोल्हे.आसिफ सौदागर,महेश खेगरे,जालींदर सांगळे, संजय खोटे ,शाहु टेकाळे, दादा पवार उपसरपंच, गोवर्धन सुळे, पंडित मानमोडे,रोहन मानमोडे,बंडु गाडे,राम सानप,बी टी खाडे सर,बाळु घुले,बाळु काका शिंदे,हानुमंत सोडंगे,यांच्यासह विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंगणवाडीतील बालकांना उष्णतेपासून संरक्षण मिळावे म्हणून उन्हाळी सुट्टी द्यावी : लेक लाडकी अभियानाची मागणी

बीड । प्रतिनिधी

राज्यात उष्णतेची तीव्र लाट सुरू असून बीड जिल्ह्यातही दिवसेंदिवस तापमानात मोठी वाढ होत आहे. अशा परिस्थितीत अंगणवाडीतील लहान बालकांच्या आरोग्याचा आणि सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तीन ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना उष्णतेच्या तीव्रतेपासून सुरक्षित ठेवण्यासाठी अंगणवाड्यांना तातडीने उन्हाळी सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी लेक लाडकी अभियान, महाराष्ट्र राज्यच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीसंदर्भात लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, मार्गदर्शक प्राचार्य डॉ. डी. जी. तांदळे , मातृभूमी प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष डॉ संजयजी तांदळे यांनी जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांची भेट घेऊन दिनांक १५ मे २०२६ शुक्रवार रोजी निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, सध्या वाढत्या उष्णतेमुळे लहान बालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अंगणवाड्यांमध्ये येणाऱ्या बालकांना पुरेसे वायुवीजन, पंखे, शुद्ध पिण्याचे



थंड पाणी आदी सुविधा अनेक ठिकाणी अपुऱ्या आहेत. त्यामुळे उष्णतेमुळे बालकांना डिहायड्रेशन, थकवा, चक्कर येणे, त्वचारोग तसेच इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. विशेष म्हणजे, प्राथमिक व माध्यमिक शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर करण्यात आलेली असताना अंगणवाड्या मात्र सुरू ठेवण्यात आल्याने बालकांच्या उपस्थितीमध्ये लक्षणीय घट झालेली आहे. पालकांमध्येही आपल्या मुलांच्या आरोग्याबाबत चिंता निर्माण झाली आहे. त्यामुळे अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर अंगणवाड्यांमध्ये टेक होम रेशनच्या माध्यमातून आहाराचे वितरण अधिक प्रभावीपणे करण्याची मागणीही करण्यात आली आहे. बालकांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने विचार करून तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा लेक लाडकी अभियानाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी या निवेदनाची गंभीर दखल घेत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याची माहिती लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी दिली.

## पोलिस अधीक्षकांनी चौकशी करून कारवाईची मागणी

### २४ तासांत चोर पकडणाऱ्या गेवराई पोलिसांनी १२ तासांत वाळूची गाडी सोडली

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई पोलिस ठाणे हद्दीत अवैध वाळू तस्करी फोफावली असून, ''२४ तासांत चोर पकडला'' असा गवगवा करणाऱ्या गेवराई पोलिसांनी अवैध वाळू वाहतूक करणारा टेम्पो १२ तासांत सोडला. यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात असून, या प्रकरणी पोलिस अधीक्षकांनी चौकशी करून दोषींविरुद्ध कारवाई करावी अशी मागणी होऊ लागली आहे.

दि. १४ रोजीच्या नाईट पेट्रोलिंगच्या अधिकाऱ्यांनी एक अनधिकृत वाळूने भरलेला टेम्पो पकडला. हा टेम्पो पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्या खाजगी डायरीत नोंद असलेला होता. संबंधित माफियाने अर्थ खाते सांभाळणाऱ्या एका कनिष्ठ अधिकाऱ्याला संपर्क साधला. त्या कनिष्ठ अधिकाऱ्याने ज्या वरिष्ठ अधिकाऱ्याने टेम्पो पकडला त्याला कॉल करून टेम्पो सोडण्यास सांगितले.



संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याने टेम्पो सोडण्यास नकार दिल्याने कनिष्ठ अधिकाऱ्याने त्यांना गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर या वरिष्ठ अधिकाऱ्याने संबंधित टेम्पो गेवराई पोलिस ठाण्यात कारवाईसाठी लावला. मात्र दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजता गेवराईचे पोलिस निरीक्षक किशोर पवार यांनी हा टेम्पो सोडला.

''२४ तासांत चोर पकडला'' असल्याचा गवगवा करणाऱ्या गेवराई पोलिसांनी १२ तासांत टेम्पो सोडल्याने याची चर्चा पोलिस कर्मचाऱ्यांत दबक्या आवाजात सुरू आहे. कर्तव्यदक्ष पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी होऊ लागली आहे.

# शेतकऱ्यांना आता मोफत गाळ मिळणार

## राज्यातील सहा मोठ्या धरणांतील गाळ काढण्यास मान्यता

मुंबई / प्रतिनिधी

राज्यातील धरणांच्या जलाशयांतील वाढता गाळ, कमी होत चाललेला पाणीसाठा क्षमता आणि अनियंत्रित वाळू उपशाच्या पार्श्वभूमीवर सहा मोठ्या प्रकल्पांच्या जलाशयातून प्रायोगिक तत्वावर गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्यास व त्याबाबतच्या सुधारित धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.या धोरणामुळे प्रकल्पांतील पाणीसाठा वाढणार असून, शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार आहे. तसेच धरणांच्या जतन-संवर्धनाच्या दृष्टीने हे पाऊल महत्वाचे ठरणार आहे. प्रायोगिक तत्वावर गाळ काढण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये उजनी, गिरणा, गोसीखुर्द, मुळा, जायकवाडी आणि हतनूर धरण या प्रकल्पांचा समावेश आहे. नव्या धोरणानुसार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांना ही कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या प्रक्रियेतून मिळणारा महसूल संबंधित सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापना व दुरुस्ती कामांसाठी वापरला जाणार आहे.

या निर्णयातील सर्वात महत्वाची बाब म्हणजे धरणांमधून काढण्यात येणारा गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात टाकण्यासाठी पूर्णपणे विनामूल्य



उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी फक्त वाहतूक खर्च करायचा असून कोणतेही स्वामित्व शुल्क आकारले जाणार नाही. यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे. गाळाच्या परिमाणानुसार निविदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ५० दशलक्ष घनमीटरपर्यंत गाळ असल्यास ५ वर्षे, ५० ते १०० दशलक्ष घनमीटरसाठी ७ वर्षे आणि १०० दशलक्ष घनमीटरपेक्षा अधिक गाळ असल्यास १० वर्षांचा कालावधी असेल. नव्या धोरणात वाळू चोरी आणि अनियमितता रोखण्यासाठी कडक तांत्रिक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. गाळमिश्रित वाळूपासून वेगळी करण्यात आलेली वाळू साठवणूक क्षेत्र जीओ फेन्सिंग अंतर्गत राहणार आहे. तेथे २४७ सीसीटीव्ही देखरेख बंधनकारक असेल. वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक राहील. वाहनांचे ई-पास, बारकोड प्रणाली आणि ऑनलाईन नोंदी ठेवण्याची सक्ती करण्यात आली आहे. जलाशयातून केवळ वाळू उपसा करता येणार नाही. गाळ आणि वाळू दोन्ही काढणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. तसेच नैसर्गिक जमिनीच्या पातळीखाली दोन फुटांपेक्षा अधिक उत्खनन करण्यास मनाई करण्यात आली आहे. पर्यावरणीय बाबींनाही या धोरणात महत्त्व देण्यात आले आहे. पर्यावरण विभागाची परवानगी, राज्य तज्ञ मूल्यमापन समिती आणि राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाची मान्यता बंधनकारक राहणार आहे. तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या सस्टेनेबल सँड मायनिंग मॅनेजमेंट गाईडलाईन्स २०१६ आणि एन्फोर्समेंट अँड मॉनिटरिंग फॉर सँन्ड मायनिंग २०२० मधील निकषांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

जलाशयांच्या पृष्ठभागावर भविष्यात सौरऊर्जा प्रकल्प, पर्यटन, जलक्रीडा किंवा जलविद्युत प्रकल्प उभारण्यास अडथळा निर्माण होणार नाही, अशी अटही करारामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.या निर्णयामुळे राज्यातील धरणांची पाणीसाठवण क्षमता वाढणे, सिंचन कार्यक्षमता सुधारणे, शेतजमिनींची सुपीकता वाढणे आणि वाळू उत्खनन प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे.

# पिकांची फेरपालट महत्त्वाचीच



शेतीविषयक सल्ला देताना अनेकदा तज्ज्ञ पिकांची फेरपालट करा असं सांगत असतात. विशेषत: ऊस, कापूस आणि मका पीक सतत घेऊ नका असे म्हटले जाते. पिके सतत एकाच जमिनीत घेतल्यास जमिनीची सुपीकता कमी होते. त्यामुळे पिकांची फेरपालट करणे गरजेचे ठरते. काही दिवसांत खरीप हंगाम सुरू होणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य फेरपालट नियोजन करणे महत्त्वाचे आहे.

एकाच जमिनीत दरवर्षी सतत एकच पीक न घेता, वेगवेगळी पिके आलटून-पालटून घेण्याच्या पद्धतीला पिकांची फेरपालट म्हणतात. एका हंगामात एकदल पीक घेतले तर पुढच्या हंगामात द्विदल पीक घ्यायचे आहे. एकदल द्विदलचा सोपा फरक म्हणजे द्विदल पिकाची बी दोन भागात समान विभागता येते. ज्याच्या बीचे दोन समान भाग होत नाही ते एकदल.. म्हणजे गहू, ज्वारी, बाजरी, मका हे सगळे एकदल. आणि मूग, उडिद, चवळी, सोयाबीन ही सगळी द्विदल पिके. आणखी फरक म्हणजे एकदल पिकाची मुळं लहान-पातळ असतात आणि गुच्छा सारखी वाढतात. तर द्विदल पिकाची मुळे लांब असतात त्यामुळे खोल जातात. याशिवाय एकदल पिकाच्या पानांवरच्या रेशा या सरळ उभ्या असतात. तर द्विदल पिकाच्या दोन भागात आडव्या आणि एकात एक मिसळत वाढतात. गहू, ज्वारी, बाजरी, मका, भात ही एकदल पिके आहेत. ही पिके जमिनीतून मोठ्या प्रमाणात अन्नद्रव्ये शोषून घेतात. तर मूग, उडीद, चवळी, तूर, हरभरा, सोयाबीन ही द्विदल पिके आहेत. ही पिके जमिनीतील नत्र वाढवण्यास मदत करतात. त्यामुळे एकदल पिकानंतर द्विदल पीक घेणे फायदेशीर ठरते.

यासाठी करा फेरपालट : सतत एकच पीक घेतल्यास जमिनीतील अन्नद्रव्ये कमी होतात. तसेच कीड-रोग आणि तणांचे प्रमाण वाढते. फेरपालट केल्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते, जमिनीत नत्राचे प्रमाण वाढते, पाण्याचा योग्य वापर होतो आणि उत्पादनात वाढ होते. विशेषतः कडधान्य पिकांच्या मुळांवर रायझोबियम जिवाणूंच्या गाठी तयार होतात. हे जिवाणू हवेतले नत्र जमिनीत स्थिर करतात. त्यामुळे मूग, उडीद, हरभरा, चवळी यांसारखी पिके जमिनीसाठी फायदेशीर ठरतात.फेरपालट करण्याचा क्रम : रब्बीमध्ये हरभरा - खरिपात मका/ सोयाबीन/ कापूस / ज्वारी घ्यावी. रब्बी किंवा उन्हाळ्यात ज्वारी/ गहू/ बाजरी - खरिपात मूग/ उडिद/ चवळी/ तूर. कापूस हे सहा महिन्याचे पीक असते. त्याची मुळे सुद्धा जमिनीत खोलवर गेलेली असतात. त्यामुळे कापसानंतर गहू / हरभरा लावावा. खरिपात भात - रब्बीमध्ये हरभरा / भाजीपाला. उसानंतर कडधान्य पिके घ्यावीत. एकंदर एकाच प्रकारची पिके सतत घेणे टाळावे. तसेच एखाद्या उन्हाळ्यात जमिनीला विश्रांती सुद्धा द्यावी.फेरपालट केव्हा करावी? जमिनीत कीड-रोग वाढत असतील, उत्पादन कमी होत असेल किंवा जमिनीचा सामू बिघडला असेल तर फेरपालट करणे अत्यंत गरजेचे असते. योग्य फेरपालट केल्यास जमीन निरोगी राहते आणि शेती अधिक फायदेशीर बनते.

# काळ्या टोमॅटोची शेती ठरतेय फायद्याची

सध्या लाल टोमॅटोनंतर आता काळ्या टोमॅटोचीही बाजारात विक्री होत आहे. हे केवळ रंगीतच नाही तर औषधी गुणधर्मांनी देखील परिपूर्ण आहे. बाजारात त्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत त्याच्या लागवडीतून बंपर मिळू शकतात. सध्या टोमॅटोचे भाव गगनाला भिडले आहेत. टोमॅटो खाणे ही सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याची बाब नाही अशा स्थितीत काळ्या टोमॅटोची चर्चा सुरू झाली आहे. सध्या भारतात गेल्या २ वर्षांपासून त्याची लागवड केली जात आहे. पूर्वी तो ब्रिटनमधून यायचा आणि इथे विकला जायचा पण आता बाजारात उपलब्ध आहे. या टोमॅटोची आता भारतातही लागवड केली जात आहे. त्याचे बियाणे ऑनलाइन खरेदी करून खरेदी करता येते.

बियाण्याच्या एका पॅकेटची किंमत ४५० रुपये आहे. एका पॅकेटमध्ये सुमारे १३० बिया असतात. काळ्या टोमॅटोची लागवड लाल टोमॅटोसारखीच आहे. हा टोमॅटो लाल टोमॅटोप्रमाणेच पिकवला जातो. वाढताना ते प्रथम हिरवे नंतर लाल होते. लाल झाल्यावर ते निळे झाल्यावर काळे होते. यामध्ये पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळतात. साखरेच्या रुग्णांसाठी हा रामबाण उपाय ठरू शकतो. काळ्या टोमॅटोमध्ये मुक्त रॅडिकल्सशी लढण्याची क्षमता असते. या कारणास्तव, ते कर्करोगाशी लढण्यास सक्षम आहे. काळ्या टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात अँटी-ऑक्सिडेंट असतात. यामध्ये प्रोटीन, व्हिटॅमिन ए, सी, मिनरल्स आढळतात, ज्यामुळे तुमचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी असल्यामुळे ते डोळ्यांसाठी फायदेशीर आहे. काळे टोमॅटो खाल्ल्याने हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता कमी होते कारण त्यात अँथोसायनिन आढळते. काळ्या टोमॅटोमध्ये चांगले कोलेस्ट्रॉल जास्त असते. जर तुम्हीही तुमच्या लठ्ठपणाने हैराण असाल तर हे नक्की खा. टोमॅटोच्या दरात सातत्याने वाढ होत आहे.

भारताचे हवामान पोषकच : इंडिगो रोझ रेड आणि पर्पल टोमॅटोच्या बिया ओलांडून नवीन बी तयार केले. ज्यामध्ये हायब्रीड टोमॅटोचा जन्म झाला. इंग्लंडप्रमाणेच भारताचे हवामानही काळ्या टोमॅटोसाठी चांगले आहे. लाल टोमॅटोप्रमाणे त्याची लागवडही केली जाते. या जातीच्या टोमॅटोच्या लागवडीसाठी उष्ण हवामान क्षेत्र योग्य मानले जाते. थंड ठिकाणी झाडे वाढू शकत नाहीत. त्याच्या लागवडीसाठी पाण्याचा उत्तम निचरा होणे अत्यंत आवश्यक आहे. तर जमिनीचे पी.एच. मूल्य ६-७ च्या दरम्यान असावे.

मिळतो चांगला फायदा : काळ्या टोमॅटोच्या लागवडीत फक्त सीड मनी लागते. काळ्या टोमॅटोच्या लागवडीचा संपूर्ण खर्च काढून हेक्टरी ४-५ लाखांचा नफा मिळू शकतो. काळ्या टोमॅटोच्या पॅकिंग आणि ब्रँडिंगद्वारे नफा आणखी वाढेल.




# सिमला मिरचीवरील रोग आणि प्रतिबंधात्मक उपाय

सिमला मिरची ही भारतातील खास भाज्यांपैकी एक आहे. त्याची लागवड शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दृष्टीने खूप फायदेशीर ठरू शकते. सिमला मिरची ही बहुमुखी आणि उच्च मूल्याची भाजी आहे. ज्याला स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी आहे. सिमला मिरची लागवडीसाठी ऑगस्ट महिना सर्वात खास मानला जातो. कारण या महिन्यात पावसामुळे पाण्याची समस्या नाही. या महिन्यात कोणत्याही पिकाच्या झपाट्याने वाढीबरोबरच उत्पादनही चांगले होते. जर तुम्हीही शिमला मिरचीची लागवड करण्याचा विचार करत असाल तर या कथेद्वारे तुम्हाला त्यापासून होणारे आजार आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय जाणून घेता येतील.

सिमला मिरचीचे रोग : जिवाणूजन्य पानांचे ठिपके - या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असलेले लहान, पाण्यात भिजलेले ठिपके दिसतात, जे नंतर तपकिरी किंवा काळे होतात. हे टाळण्यासाठी रोग प्रतिकारक वाणांचा वापर करावा. वरून झाडांना पाणी द्या जेणेकरून पाणी पानांवर पडणार नाही. जमिनीत रोगजनकांना प्रतिबंध करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत रहा.

फायटोफथोरा ब्लाइट - हे देठ आणि फळांवर खोल पाण्यात भिजलेले जखम दाखवते. याच्या प्रभावामुळे पाने कोमेजून कुजण्याची लक्षणे दिसू शकतात. हे टाळण्यासाठी पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नका. पानांवर जास्त पाणी देणे आणि सिंचन टाळा. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाका. ज्यामध्ये, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल किंवा फोसेटाइल-ॲल्युमिनियम बुरशीनाशक वापरा.



व्हर्टिसिलियम विल्ट - पाने पिवळी आणि कोमेजतात. काही प्रकरणांमध्ये पाने पूर्णपणे मरतात. हे टाळण्यासाठी प्रमाणित रोगमुक्त बियाणे व रोपे वापरावीत. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड करा आणि जास्त सिंचन टाळा. जमिनीत रोगजनकांचा जमाव कमी करण्यासाठी पिके फिरवा. या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नाहीत, त्यामुळे प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष केंद्रित केले जाते.

पावडर बुरशी - यामध्ये पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके दिसतात. हे टाळण्यासाठी, हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवा. झाडांभोवती ओलावा कमी करण्यासाठी ओव्हरहेड पाणी देणे टाळा. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट-आधारित बुरशीनाशक वापरा.

ॲफिडचा प्रादुर्भाव - ॲफिड हे लहान आणि मऊ शरीराचे कीटक आहेत जे वनस्पतींमधून रस शोषतात. यामुळे वाढ खुंटते आणि पाने विकृत होतात. हे टाळण्यासाठी, लेडीबग्स आणि लेसविंग्स सारख्या नैसर्गिक भक्षकांना प्रोत्साहन द्या. ॲफिड लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कीटकनाशक किंवा कडुलिंबाच्या तेलाचा वापर करा. वनस्पतींभोवती ॲल्युमिनियम फॉइल ॲफिड्सला प्रतिबंध करू शकते. येथे लक्षात घेण्याजोगा मुद्दा असा आहे की जेव्हा वनस्पती रोगांचे व्यवस्थापन करण्याचा विचार येतो तेव्हा उपचारापेक्षा प्रतिबंध नेहमीच चांगला असतो. कोणतेही पीक रोगांपासून दूर ठेवण्यासाठी, योग्य स्वच्छता राखणे, रोग प्रतिरोधक वाणांचा वापर करणे आणि झाडे निरोगी ठेवण्यासाठी योग्य परिस्थिती प्रदान करणे आवश्यक आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९८ : वास्को-द-गामा भारतातील कालिकत बंदरात दाखल झाला.
१८०४ : नेपोलिअन बोनापार्ट फ्रान्सचा सम्राट झाला.
१९१२ : पूर्णपणे भारतात बनवलेला मूकपट 'पुंडलिक' प्रदर्शित झाला.
१९३८ : 'प्रभात'चा 'गोपालकृष्ण' हा चित्रपट मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमात प्रदर्शित झाला.
१९४० : 'प्रभात'चा 'संत ज्ञानेश्वर' हा चित्रपट मुंबई व पुणे या ठिकाणी एकाच दिवशी प्रदर्शित झाला.
१९७२ : कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना.
१९७२ : दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना झाली.
१९७४ : भारताने पोखरण येथे आण्विक अस्त्राची पहिली यशस्वी चाचणी केली.
१९९० : फ्रान्स च्या टीजीव्ही रेल्वे ने ५१५.३ किमी/ताशी वेगाने धावण्याचा नवीन जागतिक विक्रम केला.
१९९१ : रशियाच्या सोयुझ अंतराळातुन भ्रमण करणारी हेलन शेरमन ही महिला पहिली ब्रिटिश अंतराळयात्री बनली.
१९९५ : स्थानिक ठिकाणचे ५,००० रुपयांपर्यंतचे धनादेश खात्यात भरल्यानंतर तिसर्या दिवशी ती रक्कम ग्राहकास काढण्याची मुभा द्यावी, असा आदेश 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'ने दिला.
१९९८ : पुण्याच्या सुरेन्द्र चव्हाणने जगातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर सर केले.
२००८ : भारतीय पार्श्वगायक नितीन मुकेश यांना मध्यप्रदेश सरकारने भारतीय राष्ट्रीय पुरस्कार लता मंगेशकर देऊन त्यांचा सन्मान केला.
२००९ : श्रीलंका सरकारने एलटीटीई ला पराभूत करून सुमारे २६ वर्षच्या युद्धाला संपवले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०४८ : ओमर खय्याम पर्शियन तत्त्वज्ञ, गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ आणि कवी (मृत्यू: ४ डिसेंबर ११३१)
१६८२ : छत्रपती शाहूराजे भोसले, संभाजीराजे व माहाराणी येसुबाई यांचे पुत्र.
१८५३ : ब्रिटीश कालीन भारतातील भारतीय कवी, साहित्यकार, लेखक आणि समाजसुधारक तसचं, महिलांच्या हक्काचे रक्षणकर्ते व बालविवाहविरोधक उत्कृष वकील बहरामजी मेरवानजी मलबारी यांचा जन्मदिन.
१८७२ : ब्रिटिश गणितज्ञ, तत्त्वज्ञ आणि इतिहासकार बर्ट्रांड रसेल यांचा जन्म. (मृत्यू: २ फेब्रुवारी १९७०)
१९१३ : पुरुषोत्तम काकोडकर गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, काँग्रेसचे नेते, ५ व्या लोकसभेचे सदस्य (मृत्यू: २ मे १९९८)
१९१४ : भारतीय रिजर्व बँकेच्या दहाव्या गव्हर्नर एस. जगन्नाथ यांचा जन्मदिन.
१९२० : पोप जॉन पॉल (दुसरा) (मृत्यू: २ एप्रिल २००५)
१९२२ : नार्वे देशातील मानसोपचारतज्ञ जर्डा बोयेसन यांचा जन्मदिन.
१९३३ : एच. डी. देवेगौडा, भारताचे अकरावे पंतप्रधान.
१९७७ : भारतीय इलेक्ट्रिकल्स लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व भारतीय उद्योग व्यवस्थापक अनंत बजाज यांचा जन्मदिन.
१९७९ : माईनक्राफ्ट या गेम चे सहसंस्थापक जेन्स्? बर्गेस्टन यांचा जन्म.


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८०८ : बोर्नबॉन व्हिस्की चे निर्माते एलीया क्रेग यांचे निधन.
१८४६ : मराठी पत्रकारितेचे पितामह बाळशास्त्री जांभेकर यांचे निधन. (जन्म: ६ जानेवारी १८१२)
१९६६ : वनस्पतीशास्त्रज्ञ पंचानन माहेश्वरी यांचे निधन. (जन्म: ९ नोव्हेंबर १९०४)
१९८६ : कानरू लक्ष्मण राव, स्थापत्य अभियंता.
१९९७ : कमलाबाई रघुनाथराव गोखले, पहिल्या स्त्री चित्रपट कलाकार.
१९९९ : पहिले राष्ट्रीय बुद्धीबळ विजेते रामचंद्र सप्रे यांचे निधन.
२००९ : एल. टी. टी. ई. चे संस्थापक वेल्लुपल्ली प्रभाकरन यांचे निधन. (जन्म: २६ नोव्हेंबर १९५४)
२०१२ : भारतीय धार्मिक नेते जय गुरूदेव यांचे निधन.
२०१७ : भारतीय अभिनेत्री रीमा लागू यांचे निधन. (जन्म: २१ जुन १९५८

# नवजात वासरांचे संगोपन करण्याच्या पद्धती

भारत हा कृषिप्रधान देश आहे. मोठ्या प्रमाणावर या देशात शेती केली जाते. तसेच शेतीसोबत अनेकजण पशुपालनाचा व्यवसाय करतात. याच पशुपालकांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. पशुपालकांनी जर जन्मलेल्या वासराचे नीट संगोपन केले नाही, तर ते वासरू दगावण्याची शक्यता असते. पशुपालकांना वासराचे संगोपन दोन पद्धतीने करता येते. एक म्हणजे मातृत्व पद्धत आणि दुसरी म्हणजे दाई पद्धत.

मातृत्व पद्धत : या पद्धतीमध्ये नवजात वासराला जन्मल्यापासून गाईचे दूध काढण्याच्या वेळी वासरू सोडतात. असे केल्याने गाय पान्हा सोडते. थोडावेळ गाईचे दूध वासराला पिऊन दिल्यानंतर वासराला बाजूला करून दूध काढतात. त्यानंतर परत वासराला दूध पाजतात. अनेकदा वासरांसाठी एका सडातील दूध ठेवले जाते. परंतु असे केल्याने स्वच्छ दूध उत्पादनात अडथळा निर्माण होतो. मात्र वासरू निरोगी राहते.



दाई पद्धत :दाई पद्धतीत वासराला जन्मल्यापासूनच गायी आणि म्हशी पासून वेगळे केले जाते. त्याला बाटलीने दूध पाजले जाते. त्यामुळे वासराला गरजेनुसार दूध पाजता येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दुधाची निर्मिती स्वच्छ होते. वासरा शिवाय गाई दूध देतात. त्यामुळे ही पद्धत परवडणारी आहे. हे लक्षात ठेवा की दुध पाजताना दुधाचे तापमान वासराच्या शरीरा इतके ठेवून पाजावे. त्याचबरोबर दूध पाजून झाल्यानंतर की लगेच ते भांडे गरम पाण्याने स्वच्छ धुवून कोरडे करा. या पद्धतीचा वापर केल्याने वासरांना कोणतेही आजार होत नाहीत.





# दुहेरी मार्गावरुन १ जूनपासून प्रथमच ११०किमीच्या वेगाने धावणार २७ रेल्वे

## ३० मे ला विसापूर ते सारोळादरम्यान होणार शेवटची चाचणी; प्रवाशांचा वाचणार वेळ

अहिल्यानगर । प्रतिनिधी

दौंड-मनमाड रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम आता टप्प्यात पोहोचले आहे. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून सोमवारी (१८ मे) अकोळनेर ते निंबळक या विभागातील १८.२१ किमी अंतरावर ताशी १३० किमी या वेगाने हायस्पीड इलेक्ट्रिक इंजिनची चाचणी घेण्यात येणार आहे. त्यानंतर ३० मे रोजी या रेल्वे दुहेरीकरणाचा अंतिम टप्पा असलेल्या विसापूर ते सारोळा दरम्यान १६ किमी अंतरावर रेल्वेची शेवटची चाचणी होईल. २ हजार कोटी खर्चून तयार केलेल्या या २३६ किमीच्या दुहेरी मार्गावर १ जूनपासून प्रथमच अहिल्यानगर स्थानकातून दौंड ते मनमाडदरम्यान २७ प्रवासी रेल्वे गाड्या अधिक वेगाने धावणार आहेत.

यापूर्वी क्रॉसिंगवर जात असलेल्या वेळेमुळे अहिल्यानगरहून मनमाडला जाण्यासाठी १८० मिनिटे (३ तासांचा) कालावधी लागायचा, आता तो कालावधी कमी होऊन १२० (२ तासांवर) येणार आहे. तर अहिल्यानगरहून दौंडला उर्वरित पान ४ एकूण पूल : ५ दक्षिण-उत्तर भारतातील तीर्थक्षेत्रांशी होणार कनेक्ट दुहेरीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असतानाच गेल्या वर्षभरात हंगामी सुरू असलेल्या ३ गाड्या नियमित करण्यात आल्या. रिवा-पुणे, पुणे-वाराणसी या नव्याने गाड्या सुरू झाल्या.



यापूर्वी अहिल्यानगर रेल्वे स्थानकातून २२ रेल्वे धावत होत्या, आता ती संख्या २७ झाली आहे. विशेष करून उत्तर-दक्षिण भारताची तीर्थस्थळे या रेल्वेने कनेक्ट झाली असून, भविष्यात शिर्डी ते पुणतांबा हा दुहेरी मार्ग झाल्यानंतर दक्षिण-उत्तर भारतातील तीर्थक्षेत्रे शिर्डीशी कनेक्ट होणार आहेत. विनाथांबा ताशी ११० किमी वेगाने धावणार रेल्वे मनमाड ते दौंड हा मार्ग संपूर्ण उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा मुख्य दुवा मानला जातो. हा संपूर्ण मार्ग दुहेरी होत असल्याने रेल्वे गाड्या विनाथांबा ताशी ११० ते १२० किमी वेगाने धावू शकतील. यापूर्वी सरासरी वेग हा ताशी ५० ते ६० किमी होता.

क्रॉसिंगवर थांबवण्याची आवश्यकता भासणार नाही ''मनमाड-दौंड रेल्वेचे शेवटच्या टप्प्यातील काम हे विसापूर ते सारोळा असून, ते काम देखील अंतिम टप्प्यात आले आहे. ३० मे ला या मार्गावरील शेवटचा टप्पा असलेल्या मार्गावर हायस्पीड रेल्वेची चाचणी होणार आहे. त्यानंतर १ जूनपासून या दुहेरीमार्गावर पूर्ण क्षमतेने रेल्वे धावणार आहेत. मनमाड ते दौंड दरम्यान सर्वाधिक अंतर हे अहिल्यानगर जिल्ह्यातील आहे. या दुहेरी मार्गावर रेल्वेंना क्रॉसिंगवर थांबवण्याची आवश्यकता भासणार नाही.

# छत्रपती शंभुराजे जयंती निमित्त रक्तदान



मादळमोही । प्रतिनिधी

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने जोडवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहात रक्तदान शिबीर आणि सर्व रोग निदान महा आरोग्य तपासणी शिबिर धर्मवीर प्रतिष्ठान व शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.या रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

श्रीक्षेत्र नारायणगड येथील अखंड हरिनाम सप्ताह जोडवाडी गावात सुरू असून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने धर्मवीर प्रतिष्ठान संचलित राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे साहेब व खा.श्रीकांत शिंदे साहेब यांच्या संकल्पनेतुन युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शनाने ,युवासेना बीड लोकसभा संपर्क प्रमुख बाजीराव दादा चव्हाण यांच्या माध्यमातून युवा सेना आष्टी विधानसभा संपर्क प्रमुख शिवराज उगले यांच्या सुंदर नियोजनात हा कार्यक्रम पार पडला.यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील,मराठा सेवक देविदास चव्हाण,लोकलढा समन्वयक दिनेश गुळवे,भरत पवार जनार्दन मावसकर सालपे महाराज व गावकरी सह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रथम छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबिरास प्रारंभ करण्यात आला.यावेळी पंचक्रोशीतील हजारो नागरिकांनी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

# अल्पभूधारक शेतकऱ्याची शेतात गळफास घेऊन आत्महत्या

हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोली तालुक्यातील जयपूरवाडी येथील एका अल्पभुधारक शेतकऱ्याने कर्जाला कंटाळून शेतात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी ता. १७ उघडकीस आली आहे. हिंगोली ग्रामीण पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या शासकिय वैद्यकिय महाविद्यालयात आणण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली तालुक्यातील जयपूरवाडी येथील शेतकरी मारोती नामदेव फाळके (४४) यांना साडेतीन एकर शेत आहे. घरी आई, पत्नी, मुलगा असा परिवार असून या शेतावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. या शेतीवर त्यांनी बँकेचे कर्ज घेतले होते. मात्र मागील दोन ते तीन वर्षापासून सतत होणाऱ्या नापीकीमुळे कर्ज कसे फेडावे याची चिंता त्यांना लागली होती.


दरम्यान, मागील वर्षी खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले. लागवडीचा खर्चही निघाला नाही. त्यामुळे सर्व आशा रब्बी हंगामावरच होत्या. मात्र रब्बी हंगामातही अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान झाले. दोन्ही हंगामात नुकसानच झाल्याने आता कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा तसेच कर्ज कसे फेडावे याची चिंता त्यांना लागली होती. दरम्यान, शनिवारी ता. १६ रात्री फाळके कुटुंबिय जेवण करून झोपी गेले होते. मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास मारोती झोपेतून जागे झाले अन त्यानंतर ते थेट शेतात गेले. त्या ठिकाणी त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. मात्र घराबाहेर गेलेले मारोती फाळके बराच वेळ होऊनही घरात कसे आले नाही यामुळे त्यांचा मुलगा व भाऊ यांनी परिसरात पाहणी केली.

# ८५०० उमेदवारांनी दिली एसआरपीएफची लेखी परीक्षा

## ४ परीक्षा केंद्रांवर शांततेत परीक्षा, पण बॅगा ठेवण्याची सोय नसल्याने परीक्षार्थींची धावपळ

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) पोलीस शिपाई भरतीची लेखी परीक्षा रविवारी सकाळी शहरातील चार केंद्रांवर शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. सकाळी ११ ते १२.३० या वेळेत घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी तब्बल ८ हजार ५०० उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यामुळे सकाळपासूनच परीक्षा केंद्र परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळाली. कडक तपासणी करूनच केंद्रात प्रवेश देण्यात आला. पण परीक्षा केंद्रांवर उमेदवारांनी आणलेले साहित्य ठेवण्यासाठी कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे त्यांना आपल्या बॅगा परीक्षा केंद्राबाहेर उघड्यावर ठेवाव्या लागल्या काही



बॅगा झाडांवर अडकवलेल्याही दिसून आल्या.

एमआयटी कॉलेज, श्रेयस कॉलेज, चाटे स्कूल आणि एंजल कीड स्कूल या चार केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस विभाग आणि प्रशासनाच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले होते. केंद्र परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उमेदवारांना प्रवेश देण्यापूर्वी कडक तपासणी करण्यात आली. परीक्षेसाठी उमेदवार सकाळी लवकरच केंद्रावर दाखल झाले. केंद्रांबाहेर पालक आणि नातेवाईकांचीही मोठी उपस्थिती दिसून आली. परीक्षा प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली. परीक्षेच्या कामकाजासाठी एकूण एक हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. पोलीस विभागाच्या नियमानुसार संपूर्ण परीक्षाप्रक्रिया सुरळीत पार पडली. परीक्षा केंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. पण उमेदवारांनी आणलेले साहित्य ठेवण्याची कोणतीही तजवीज नव्हती. अनेक उमेदवार बाहेर गावांवरून आले होते. त्यामुळे त्यांच्यापुढे आपल्यासोबतच्या बॅगा कुठे ठेवायच्या हा प्रश्न होता. अखेर त्यांनी परीक्षा केंद्राबाहेर असणाऱ्या झाडांखाली व झाडांवरच अडकवून आपल्या बॅगा ठेवणे पसंत केले. याचे काही फोटो व व्हिडिओ समोर आले आहेत. त्यात परीक्षा केंद्रावर ठिकठिकाणी बॅगा पडलेल्या दिसून येत आहे.

# श्री अगस्ति ऋषी आश्रमात उद्यापासून महिनाभर अधिकमास कीर्तन महोत्सव

## ग्रंथपारायण, अन्नदानआणि दिग्गज कीर्तनकारांची मांदियाळी

अकोले । प्रतिनिधी

अकोले तालुक्याचे आराध्यदैवत श्री अगस्ति ऋषी आश्रमात वर्षानुवर्षांच्या परंपरेनुसार रविवारपासून (१७ मे) पुरुषोत्तम (अधिक) मासानिमित्त अखंड महिनाभर कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अगस्ति देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.के.डी.धुमाळ यांनी दिली.

महोत्सवाचा शुभारंभ रविवारी सकाळी ८:३० वाजता आमदार डॉ. किरण लहामटे, हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, ज्येष्ठ विश्वस्त बद्रिनाथशेठ मुंदडा व अध्यक्ष धुमाळ यांच्या हस्ते ध्वजारोहणाने होईल. महिनाभर ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत आणि 'अगस्त्य महात्म्य' ग्रंथांचे पारायण केले जाईल. महोत्सवात स्वामी गोविंददेव गिरीजी, इंदोरीकर महाराज, देविदास महाराज म्हस्के यांच्यासह अनेक दिग्गजांची कीर्तने होतील. सांगता उद्धव महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल. या धार्मिक सोहळ्यासोबतच देवस्थानने सामाजिक बांधिलकी जपत ३१ मे व १ जून रोजी दुग्ध व्यावसायिक व शेतकऱ्यांसाठी ''कृषी मार्गदर्शन शिबिर' आयोजित केले आहे. यात महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ ऊस व डाळिंब व्यवस्थापनावर मार्गदर्शन करतील. तसेच २७ मे रोजी मोफत नेत्ररोग व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांसाठी दोन हजार आसनक्षमतेचा वॉटरप्रूफ मंडप व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. वर्षभर उपक्रमांची मांदियाळी धार्मिक परंपरेनुसार अगस्ति आश्रमात महाशिवरात्री उत्सव, अखंड हरिनाम सप्ताह आणि कुस्त्यांचा हगामा रंगतो. याशिवाय सामाजिक बांधिलकीतून देवस्थानच्या वतीने सामुदायिक विवाह सोहळा, गोशाळा, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, बालसंस्कार शिबिर आणि वारकरी गुरुकुल यांसारखे समाजोपयोगी उपक्रम वर्षभर राबविले जातात.

# चौसाळा ते खांमगांव मधील प्रलंबित शेतकऱ्यांचा मोबदला वाटप करा -पालीमकर

बीड । प्रतिनिधी

धुळे-सोलापुर या राष्ट्रीय महामार्ग २११ अंतर्गत येणाऱ्या चौसाळा ते खांमगांव राष्ट्रीय महामार्ग २११ चे भुसंपादन २०१३ ते २०१७ पर्यंत कार्यवाही सुरु होती. तत्कालिन उपजिल्हाधिकारी भुसंपादन जा.प्र. यांनी मुळ निवाडे प्रसिध्द करुन नॅशनल हायवे कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना सादर केले होते. त्यानुसार मावेजा वाटप करण्यात आला. यानंतर सर्व शेतकऱ्यांनी नॅशनल हायवे एक्ट १९५६ व २०१३ भुसंपादन कायदा यानुसार लवाद जिल्हाधिकारी बीड येथे वाढीव मोबदला मिळणेसाठी प्रकरणे दाखल केली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे सुनावण्या घेण्यात आल्या. परंतु काही प्रकरणांत नियम धाब्यावर बसवुन मागील तारखेत किंवा तत्परतेने निकाल देण्यात आले. परंतु संपादीत संघ नॅशनल हायवे कार्यालय यांनी त्या प्रकरणात मावेजा मंजुर करुन आपणांकडे पाठविला. परंतु हे प्रकरणे मागील तारखेत किंवा नियमबाह्य आहेत असे सर्व वर्तमानपत्रात छापुन आलेले आहे. मा. जिल्हाधिकारी कार्यालयामधील काही भ्रष्ट कर्मचारी व तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी गैरकृत्य केलेले आहे. परंतु या प्रकरणात बाधीत शेतकरी यांचा



मोबदला नॅशलन हायवे कार्यालय यांनी आपणांकडे पाठवलेला आहे असे दिसुन येत आहे. यामुळे त्यांच्या पापाचे फळ प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना देण्यात येऊ नये तसेच शेतकऱ्यांचा हक्क मारता येणार नाही. कारण नॅशनल आयवे एक्ट १९५६ व भुसंपादन कायदा २०१३ नुसार शेतकऱ्यांना वाढीव मोबदला मागण्याचा पुर्ण अधिकार देण्यात आलेला आहे. त्यामुळे आपणामार्फत प्रलंबीत असलेला शेतकऱ्यांचा सर्व मोबदला त्वरीत वाटप करण्यात यावा. अशी मागणी शेतकरी राजा सामाजिक समितीचे मराठवाडा अध्यक्ष प्रवीण पालीमकर यांनी निवेदना मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे. तरी मा. जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालुन योग्य ती कार्यवाही करुन शेतकऱ्यांवर झालेला अन्याय दुर करावा अशी विनंती बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून शेतकरी राजा सामाजिक समितीच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री, तसेच उपमुख्यमंत्री यांना देखील करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात शेतकऱ्यांना तात्काळ योग्य तो न्याय मिळवून द्यावा. अशी मागणी शेतकरी राजा सामाजिक समितीचे मराठवाडा अध्यक्ष प्रवीण पालीमकर यांनी केली आहे.

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड-विभाग)**

**ता. आष्टी जि. बीड**

Email id-tahsildarashti@gmail.com

**दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२**

**क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म-मृत्यू/कावी-**

**दि. १२/०५/२०२६**

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये - सर्व जनतेस मौजे आष्टी ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि. अर्जदार, नामे, रामदास त्रिंबक सुंबे- रा. सु.देवळा ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे नामे, वसुंधरा रामदास सुंबे रा. सु.देवळा ता. आष्टी जि.बीड याची जन्म/मृत्यू दि. २८/१०/२००४ रोजी मोजे. सु.देवळा ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगी यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १२/०५/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /-
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी**

# वाळू तस्कराची महसूलसह पोलिसांना शिवीगाळ

## पोलिसी खाक्या दाखवताच उतरली झिंग; माफीनाम्याचा व्हिडिओ व्हायरल

हिंगोली । प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील गोरेगाव चौफुली भागात मध्यरात्रीच्या सुमारास वाळूचे टिप्पर पकडल्यानंतर महसूल व पोलिस अधिकाऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करणाऱ्या वाशिमच्या वाळू तस्कराची पोलिसांनी झिंग उतरवली. आपली चूक झाल्याची उपरती झाल्यानंतर त्याने माफी मागितली अन्? त्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला आहे. विदर्भातील वाशिम भागातून एका टिप्परमधून गुरुवारी ता. १४ मध्यरात्री उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे व पथकाने गोरेगाव ते सेनगाव रोडवरील गोरेगाव चौफुलीवर त्यांनी एक टिप्पर थांबवून चालक समाधान राऊत (रा. तोंडगाव, जि. वाशिम) याची चौकशी केली असता त्याला समाधानकारक उत्तरे देता आली नाही. त्यामुळे सदर वाळू अवैध असल्याने उपविभागीय अधिकारी घुटुकडे यांनी टिप्पर गोरेगाव पोलिस ठाण्यात आणण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी एका बोलोरो जीपमधून आलेल्या संजय गोरे (रा. तोंडगाव, जि. वाशीम) याने त्या ठिकाणी येऊन टिप्पर समोरच जीप उभी



केली अन टिप्पर नेण्यास मज्जाव केला तसेच चालक राऊत यास पळवून लावले. यावेळी त्याने गोंधळ घालून उपविभागीय अधिकारी घुटुकडे यांना जिवे मारण्याची धमकी दिली. मात्र त्याच्या धमकीला भिक न घालता घुटुकडे यांनी तातडीने गोरेगाव पोलिसांना पाचारण केले. त्यानंतर गोरेगाव पोलिसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता संजय याने पोलिस व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली तसेच आर्थिक देवाण घेवाणीचे आरोपही लावले. टिप्पर पेटवून देण्याची धमकीही दिली. मात्र यावेळी पोलिसांनी नमते घेत त्याला गोड बोलून ताब्यात घेतले अन पोलिस ठाण्यात आणले. त्यानंतर फरार झालेल्या टिप्पर चालक समाधान राऊत यालाही ताब्यात घेतले.दरम्यान, पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर त्याचा चांगलाच पाहूणचार केला. त्यानंतर संजय याला उपरती झाली अन त्याची चुक कळली. त्याने लगेचच व्हिडीओ तयार करून महसूल अधिकारी व पोलिसांची माफी मागितली. सदर व्हिडीओ सोशल मिडीयावर चर्चेचा विषय बनला आहे.

# पोलिसांचा जुगार अड्ड्यावर छापा

## पावणे चार लाखाचा मुद्देमाल जप्त

मंठा । प्रतिनिधी

जांभरुन ता. मंठा येथील शेत परिसरात आंब्याच्या झाडाखाली मोकळ्या जागेत हार - जीत जुगार खेळणाऱ्या पाच आरोपींविरुद्ध मंठा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार जांभरून ता. मंठा शिवारात आरोपी विजय बबीराम राठोड, संदीप प्रल्हाद चव्हाण, रमेश हरी चव्हाण, सचिन आसाराम चव्हाण, राहुल नारायण चव्हाण, सर्व रा. दहा ता. मंठा जि. जालना. हे ता. १६ मे रोजी सायंकाळी पाच वाजता पैशावर हार-जीत जुगार खेळताना मिळून आले. पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष बाबुराव बनकर यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध सी आर नंबर. २३१/२०२६ कलम १२ (अ) म.जु.क. प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्यात रोख रक्कम ६ हजार १००/- रुपये, विविध मोटरसायकली अंदाजे किंमत ३ लाख ८० हजार रुपये,५२-५२ पत्त्याचे दोन कॅट असा एकूण ३ लाख ८६ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल श्री मुंडे हे करीत आहेत.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षकतेघबीरसिंघ संधू उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली मंठा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश इधाटे, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे, पोलीस हेडकॉन्स्टेबल रखमाजी मुंढे, विलास कातकडे, संतोष बनकर, आसाराम मदने, आनंद ढवळे, सज्जन काकडे, अनिल राठोड, श्रीकांत काळे इत्यादींनी केली.

# घोसापुरीत दोन गटात रक्तरंजीत थरार!

बीड । प्रतिनिधी

शेतात वावरतांना अंगावर माती उडाल्याच्या किरकोळ कारणावरून काल रात्री झालेल्या दोन गटातील वादाला आज सकाळी तुंबळ हाणामारीचे स्वरूप आले. दोन गटात झालेल्या तलवार आणि कुऱ्हाडीच्या हल्ल्यामध्ये २० जण गंभीर जखमी झाल्याची घटना बीड शहरापासून जवळच असलेल्या घोसापुरी येथे घडली. हल्ल्यातील जखमींवर जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू असून अनेकांच्या हाताला, डोक्याला गंभीर दुखापती झाल्या आहेत. दरम्यान आज सकाळी ७ वाजता ही घटना घडल्यानंतर रक्ताच्या थारोळ्यातील जखमी थेट एसपी ऑफीसच्या दारातच जाऊन बसले. काही जखमी तर पायऱ्यांवर झोपले सुध्दा होते. या घटनेने खळबळ उडाली असून



संपुर्ण गावात तणावपुर्ण शांतता आहे. या प्रकरणात दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

बीड तालुक्यातील घोसापुरी येथे काल रात्री किरकोळ कारणावरून दोन गटात हाणामारीची घटना घडली होती. यामध्ये काही जखमी झालेल्यांना जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र रात्री झालेल्या याच वादाचा वचपा काढण्यासाठी आज सकाळी ७.३० च्या सुमारास दुसऱ्या गटाने जोरदार हल्ला चढवला. दोन्ही गट हातात तलबारी आणि कुऱ्हाडी घेऊन समोरा समोर भिडल्याने घोसापुरी गावाला रणमैदानाचे स्वरूप आले होते. हल्लेखोरांनी महिला आणि लहान मुलांवरही दया दाखवली नाही. समोर दिसेल त्याला दोन्ही गटातील एकमेकांनी लाठ्या काठ्यांनी आणि तलवार, कुऱ्हाडीने मारहाण केली. या मारहाणीत दोन्ही गटातील २० जण गंभीर जखमी झाले आहेत.

# वैष्णवी पाटील हिचे अमेरिकेत यश

## मायक्रो बायोलॉजी अॅण्ड इम्युनॉलॉजी या विषयात मास्टर डिग्री प्रदान

बीड । प्रतिनिधी

येथील सहयोगनगर भागातील रहिवासी उदय पाटील यांची कन्या वैष्णवी हिने मायक्रो बायोलॉजी अॅण्ड इम्युनोलॉजी या विषयात अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यातील विद्यापीठातून मास्टर डिग्री पूर्ण केली आहे. तिच्या या यशाबद्दल अभिनंदन केले जात आहे.



अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यातील स्कूल ऑफ मेडिसीन अॅण्ड डेंटीस्ट्री युनिव्हर्सिटी ऑफ रॉचेस्टर येथे तिने ही डिग्री प्राप्त केली आहे. गेल्या दोन वर्षांपासून अथक परिश्रम करून वैष्णवीने कुटुंबासह बीडचे नाव मोठे केले आहे. वैष्णवीचे प्राथमिक शिक्षण बीड, संभाजीनगर येथे झाले आहे. त्यानंतर पदव्यूत्तर शिक्षण पनवेल येथे पूर्ण केले. पनवेल नंतर मास्टर डिग्री प्राप्त करण्यासाठी तिने न्यूयॉर्क येथील कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. नुकताच तिचा पदवीदान समारंभ न्यूयॉर्क येथे पार पडला. वैष्णवीने मिळविलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# कुऱ्हाडीने गंभीर मारहाण प्रकरणातील पाच आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड । प्रतिनिधी

बीड ग्रामीण पोलीस ठाण्या अंतर्गत दाखल असलेल्या कुर्हाडीने गंभीर मारहाण प्रकरणातील पाच आरोपींची निर्दोष मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड यांनी पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. हा निकाल आज शनिवार दि. १६ मे २०२६ रोजी देण्यात आला.

सदर प्रकरणात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी नामे वसंत रामा डफाळ, शिवाजी रामा डफाळ, पोपट उर्फ सखाराम रामा डफाळ, मच्छिंद्र रामा डफाळ, कालिंदा मच्छिंद्र डफाळ या सर्वांनी फिर्यादी दिगांबर रामा डफाळ सर्व राहणार मेंगडेवाडी ता.जि.बीड यांना कुर्हाडीच्या सहाय्याने डोक्यामध्ये गंभीर मारहाण करुन जखमी केले होते याबाबतची फिर्याद ग्रामीण पोलीस ठाण्यात देण्यात आली होती.त्यानंतर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १७५/२०२० अन्वये भादवि कलम १४३, १४७, १८८, २६९, २७०, ३२३, ३२६, ५०४, ५०६ राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१-ब व कोव्हीड-१९ अधिनियम २०२० मधील कलम ११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधित पोलीस ठाण्यामार्फत दोषारोपपत्र मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड येथे आर.सी.सी. क्रमांक ५०५/२०२० अन्वये दाखल करण्यात आले. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाच्या वतीने फिर्यादी, तपासी अधिकारी ◀◀ पान ३ वर

# कोर्टाच्या निकालालाही केराची टोपली?

## शेतातून जबरदस्तीने रस्ता पाडत कुऱ्हाडीने जीवे मारण्याची धमकी; धोंडराईतील शेतकरी कुटुंब भयभीत

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील धोंडराई येथे जमीन व रस्त्याच्या वादातून गंभीर प्रकार समोर आला असून, एका शेतकऱ्याच्या मालकीच्या शेतातून जबरदस्तीने रस्ता पाडत ट्रॅक्टर घालण्यात आल्याचा तसेच कुऱ्हाड घेऊन जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित शेतकऱ्याने थेट जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे धाव घेत न्याय व संरक्षणाची मागणी केली आहे.

धोंडराई येथील रहिवासी दिलीप पि. वसंतराव कुलकर्णी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या मालकी व ताब्यात असलेल्या सर्व्हे क्रमांक २५९ मधील सुमारे ३ हेक्टर ७० आर जमिनीत कोणताही अधिकृत रस्ता नसताना, दिनांक १४ मे रोजी दुपारच्या सुमारास जबरदस्तीने ट्रॅक्टर घालून रस्ता पाडण्यात आला. यावेळी ट्रॅक्टर क्रमांक एमएच-२९ बीसी २२८४ घेऊन आलेल्या दिपक आसाराम निकम यांनी शेतातील बांध फोडत उत्तरेकडून दक्षिणेकडे मार्ग काढल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, हा रस्ता का पाडत आहात? असा जाब विचारताच हातात कुऱ्हाड घेऊन अंगावर धावून येत याच रस्त्याने जाईल, अडवले तर जीवनातून संपवू, अशी उघड धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित शेतकरी कुटुंबामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणात दिवाणी न्यायालयाने यापूर्वीच संबंधित सर्व्हे क्रमांक २५९ मधून रस्ता काढू नये, असा निकाल दिलेला असल्याचा दावा कुलकर्णी यांनी केला आहे. मात्र न्यायालयीन आदेश असतानाही दिपक आसाराम निकम, सुवर्णा दिपक निकम, शंतनू दिपक निकम, समर्थ दिपक निकम व गोवर्धन आसाराम निकम हे संगनमत करून सातत्याने त्रास देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, गेल्या जवळपास दहा वर्षांपासून संबंधितांकडून जमीन वहिती करण्यास अडथळे निर्माण केले जात असून, कुटुंबावर दबाव टाकून जमीन विकण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही म्हटले आहे. तसेच वरील लोकांकडून कधीही अनुचित प्रकार घडू शकतो, अशी भीती व्यक्त करत पोलीस प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे ग्रामीण भागातील जमीन-विवाद, शेतरस्ते आणि

# स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी अचूक नियोजनाची गरज

## आदित्य महाविद्यालयामध्ये मास्टरक्लास संपन्न

बीड । प्रतिनिधी

आजच्या अत्यंत स्पर्धात्मक युगात केवळ अभ्यास करून चालत नाही, तर योग्य नियोजन आणि वेळेचे व्यवस्थापन करूनच सरकारी नोकरीचे ध्येय गाठता येते, असे प्रतिपादन जलसंपदा विभागाचे उपव्यवस्थापक दिनेश आसाराम शेळके यांनी केले. शहरातील आदित्य इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये आयोजित 'पब्लिक सेक्टर पाथवेज: मास्टरक्लास ऑन एक्झाम स्ट्रॅटेजी या विशेष मार्गदर्शन सत्रात ते बोलत होते.



अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना MPSC, UPSC आणि इंजिनिअरिंग सर्व्हिसेस सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, यासाठी या मास्टरक्लासचे आयोजन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश बहादूरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर विभागप्रमुख प्रा. कावळे एस. एम., प्रा. चव्हाण सी. एच., प्रा. गरकळ एम. बी. आणि प्रा. चौधरी एस. एस. यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्रा. चव्हाण सी. एच. यांनी केले. दीड तास चाललेल्या या सत्रात शेळके यांनी

# युवकांसाठी 'अमृत'चे मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण; अधिकृत परवानाही मिळणार

## खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकातील युवकांनी अर्ज करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

आधुनिक काळात शेती, सर्वेक्षण, फोटोग्राफी, सुरक्षा तसेच विविध तांत्रिक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. भविष्यातील वाढती गरज ओळखून महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल ज्यांना कुठलाही स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था अथवा महामंडळ नाही अश्या युवक-युवतींसाठी पूर्णपणे मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. अमृत ड्रोन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण व शहरी भागातील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना DGC- मान्यताप्राप्त अधिकृत ड्रोन पायलट परवाना (License) देण्यात येणार असून, त्याद्वारे कृषी, सर्वेक्षण, ड्रोन फवारणी, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, आपत्ती व्यवस्थापन तसेच ड्रोन मास्टर ट्रेनर म्हणून करिअरच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. प्रशिक्षण कालावधी १० दिवसांचा असून संपूर्ण प्रशिक्षण मोफत दिले जाणार आहे. तसेच प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांच्या राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ब्राह्मण, मारवाडी, बनिया, राजपुरोहित, कायस्थ, ऐय्यंगार,

# अतिक्रमणावर दुसऱ्या दिवशीही कारवाई

## नगर पालिका व वाहतुक शाखेची संयुक्त कारवाई

**बीड । दिव्य रिपोर्टर**

आज दि.१६ मे २०२६ शनिवार रोजी दुपारी १२ ते ३.०० च्या दरम्यान कडाक्याच्या उन्हासह नगर पालिका व वाहतुक शाखेने बेकायदेशीर मार्गाने अतिक्रमण करणार्यां चांगलाच हादरा दिला आहे.

सदर कारवाई ही जालना रोड, सरकारी दवाखाना, पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरील रोड दरम्यान रस्त्यावर अतिक्रमण करणार्या २५ अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यात आली. तद्नंतर या रस्त्याने मोकळा श्वास घेतल्याचे चित्र पहायला मिळाले. यावेळी वाहतुक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर यांनी प्रत्यक्ष कडाक्याच्या उन्हामध्ये उभारुन कारवाई केली व यापुढे अतिक्रमण करु नका असे आवाहन केले आहे.

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत व नगर पालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या सांगण्यावरुन नगर पालिकेचे अतिक्रमण विभागप्रमुख मुन्ना गायकवाड आणि वाहतुक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विष्णु काकडे, बाळु नागरगोजे, आदिनाथ मुंडे, फुलचंद जाधव, त्रिंबक कुडके, पोलीस हवालदार चालक संतोष हारके, पोलीस चालक अंमलदार दत्ता कदम, नगर पालिका कर्मचारी शरद खुपसे, विकी दागड, लखन तुसांबड, अविनाश डुलगज, महेश खुपशे, किरण भिसे, राम रोकडे, पवन लाहोट आदींनी या संयुक्त कारवाईमध्ये सहभाग नोंदविला. तसेच यापुढेही कारवाई चालूच राहील असे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी आवाहन केले आहे. या कारवाईमुळे शहरातील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.



# बलात्कार प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता -अॅड. तेजस नेहरकर

बीड । प्रतिनिधी

घटनेची हकीगत अशी की पीडित तरुणी तिच्या गावांमध्ये सकाळी अकराच्या दरम्यान दारात बसलेली असताना तिला एकटी पाहून आरोपी तिच्याजवळ गेला व तिचा वाईट हेतूने हात धरून विनयभंग केला. व तुझ्या घरात जाऊन बसू असे म्हणून लज्जास्पद वर्तन केले व बळजबरीने घरात घेऊन गेला व पिढीतेला तिची व्हिडिओ क्लिप व्हायरल करीन अशी धमकी देऊन पीडित तरुणीवर बलात्कार केला व झालेली घटना कोणाला सांगितली तर पीडीतेला व तिच्या नवऱ्याला जीव मारून टाकण्याची धमकी दिली याप्रकरणी आरोपी विरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ३२/ २०२२ दिनांक.१/४/२०२२. रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुद्ध कलम भारतीय दंड संहिता ३५४ आ, ३५४ क ,४५२, ५०६, ३७६, १ नुसार गुन्हा दाखल करून आरोपी ला अटक करण्यात आली होती. त्यामध्ये तपास पूर्ण होऊन आरोपीविरुद्ध



चार्जशीट सेशन केस नंबर.१४७/२२ नुसार न्यायालयात दाखल करण्यात आले होते त्यामध्ये पीडित तरुणीसह इतर साक्षीदार यांची साक्ष माननीय न्यायालयात तपासण्यात आली. आरोपीवर केलेले आरोप व कुठलाही पुरावा मा. न्यायालयात फिर्यादीला सिद्ध करता आला नाही असा युक्तिवाद ड.तेजस नेहरकर यांनी करून सर्व केस ही पुराव्याअभावी दाखल करण्यात आलेली आहे. आरोपी आकाश शिंदे हा निर्दोष आहे तो तिथे हजर नव्हताच असा आरोपी तर्फे बचाव करत त्याची या केस मधून मुक्तता करण्यात यावी असा युक्तिवाद पुराव्यासहित मा. न्यायालयात सिद्ध केला . त्यावर माननीय न्यायालयाने निकाल देत १३/५/२०२६ रोजी आरोपीची संबंधित गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणात आरोपीतर्फे अॅड.तेजस नेहरकर यांनी कामकाज पाहिले त्यांना अॅड. गौतम नाईकवाडे. अॅड. रविराज राठोड. अॅड. दत्ता केसकर. अॅड. सिकंदर यांनी सहकार्य केले.

# शनि अमावस्या व शनि जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र शनि मंदिरात भक्तांची प्रचंड गर्दी

## हजारो भाविकांनी घेतले शनि महाराजांचे दर्शन; तेल अभिषेक, महाप्रसाद व विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी :

साडेतीन शक्तीपीठांपैकी एक मानल्या जाणार्या बीड शहरातील पेठ बीड भागातील प्रसिद्ध श्रीक्षेत्र शनि मंदिर येथे आज शनिवार दि. १६ मे २०२६ रोजी शनि अमावस्या तसेच शनि जयंतीनिमित्त हजारो भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने शनि महाराजांचे दर्शन घेतले. सकाळपासूनच मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली होती. सकाळी ७ वाजल्यापासून दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

यंदाची शनि अमावस्या शनिवारी आल्याने धार्मिक दृष्ट्या विशेष योग मानला जात असून, याच दिवशी शनि महाराजांची जयंतीदेखील साजरी करण्यात आली. हिंदू धर्मशास्त्रानुसार ज्येष्ठ अमावस्येला भगवान शनिदेवांचा जन्म झाल्याची मान्यता असल्याने या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे राज्यासह परिसरातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने बीड येथील श्रीक्षेत्र शनि मंदिरात दाखल झाले होते.

मंदिरात मध्यरात्री १२ वाजल्यापासून शनिदेवांना तेलाचा अभिषेक सुरू करण्यात आला होता. पहाटेपर्यंत अखंड अभिषेक, मंत्रोच्चार व धार्मिक विधी सुरू होते. मंदिर परिसर 'जय शनिदेव', 'शनि महाराज की जय' अशा जयघोषांनी दुमदुमून गेला होता. भाविकांनी काळे तीळ, तेल, फुले, नारळ अर्पण करून शनिदेवांची पूजा केली. यावेळी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मंदिरात अभिषेक करून शनि महाराजांचे दर्शन घेतले. हेमंत क्षीरसागर तसेच शुभम धूत यांच्यासह मान्यवरांनी दर्शन घेतले



त्यांनी मंदिर परिसरातील धार्मिक कार्यक्रमात सहभागी होत भाविकांना शनि जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

उन्हाचा वाढता तडाखा लक्षात घेता मंदिर संस्थानच्या वतीने भाविकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भक्तांना उष्णतेचा त्रास होऊ नये यासाठी तुषार सिंचनाच्या फवार्यांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच पिण्याच्या पाण्याची व सावलीचीही उत्तम सोय करण्यात आली होती. मंदिर प्रशासनाच्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक करण्यात आले.

दरम्यान, एका भक्ताने शनि महाराजांना चांदीचा आकर्षक मुखवटा अर्पण केला. या मुखवट्यामुळे मंदिरातील मूर्तीचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते. मंदिर परिसर फुलांची सजावट व विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता.

भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते. मंदिर संस्थानच्या वतीने सुमारे ३० किलो खिचडीचे वाटप करण्यात आले, तर ५ हजार लाडूंचा प्रसाद भाविकांना देण्यात आला. हजारो भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला. दिवसभर मंदिर परिसरात भक्तांची गर्दी कायम होती. शनि अमावस्या व शनि जयंतीच्या निमित्ताने भक्तांनी शनिदेवांच्या चरणी प्रार्थना करत सुख-समृद्धी, आरोग्य व संकटमुक्त जीवनासाठी साकडे घातले. धार्मिक उत्साह, भक्तिभाव आणि सुव्यवस्थित नियोजनामुळे यंदाचा शनि जयंती सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

